Estd: 6 Jan. 1979
Reg.No.:MAH/1184/Kop.
E-mail : bacpvd@yahoo.co.in

UGC (2 f & 12 B) dt. 23 June 2006
Perm. Affi.No.Affi/T.2/SGB/10780 dt.16 Feb.2005
Jr.College Index No.23-06-004 J



Jayprakash Education Society's
DR. BABASAHEB AMBEDKAR MAHAVIDYALAYA
Barrister Tatyasaheb Mane Vidyanagar, Peth Vadgaon - 416112.
Dist. Kolhapur (Maharashtra) Ph.Office : 0230-2471086





(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

Founder Chairman : **Hon. Adv. Nanasaheb S. Mane** B.A., LLB., Ex.MLA
Chairman : **Shri. Satish S. Mane** M.A., M.Phil
Principal : **Dr. S. D. Disale** M.Sc. Ph.D
Mob. : 7709880950

# 3.2.1.

## Number of papers published per teacher in the Journals notified on UGC website during the year 2023-24

## Particulars

| Sr. No. | Title of the Teacher | Name of the Paper |
|---|---|---|
| 1 | Dr. Padmakar Sarjerao | वंचित समाजातील स्त्रियांचा वांग्मयीन हुंकार म्हणजे दलित, आदिवासी स्त्रियांची कविता |
| 2 | Dr. Ranjeet P. Mane & Dr. Haji D. Nadaf | वंचित इतिहासाच्या परिप्रेक्षातून दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान व भारतीय इतिहासलेखन आणि सबअल्टर्ण इतिहासलेखन परंपरा |
| 3 | Dr. Mallikarjun Bandare & Dr. Haji D. Nadaf | भारतीय इतिहासलेखन आणि सबअल्टर्ण इतिहासलेखन परंपरा |
| 4 | Mr. Shivkant M. Pupalwad | जैन समाजाचे भारतीय विकासात योगदान |

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# || संशोधक ||

पुरवणी अंक ८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)

- शके १९४५
- वर्ष : ९२
- पुरवणी अंक : ८

### संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

### अतिथी संपादक

- प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे
- डॉ. एस. व्ही. पणदे
- डॉ. बी. एम. मगदूम

✱ प्रकाशक ✱

### श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

### कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/–
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/–, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/–

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. **Unsung Hero of the Freedom Movements of Maharashtra**

- Prin. Dr. K. H. Shinde ---------- १

२. **Dr. Ambedkar's Thought's Regarding Women Empowerment**

- Prin. R. S. More ---------- १३

३. **Unsung feminist and Physician Dr. Rukhmabi Save**

- Prof. (Dr.) Sagar Kundlik Shinde ---------- १५

४. **Evaluation of Subaltern Studies**

- Dr. Nalini Avinash Waghmare ---------- १८

५. **Relation between Motivation, Personal Responsibility & Knowledge Ability The Entrepreneurial traits of Physical Education & Sports Students**

- 1. Anshul Mehrottra, 2. Dr. Malika Sharma, 3. Dr. Ikram Hussain ---------- २३

६. **Protection of Rights of Transgender in India - An Analytical Study**

- Dr. Leena Langde ---------- २७

७. **Origin, Migration and Social Movements of Banjara Tribe in Maharashtra State-A Histogical Study**

- Dr. S. B. Rathod ---------- ३१

८. **'Why am I Flawed Being?' : Desire for Recognition and Identity in A. Revathi's Truth of My Life A Hijra Story'**

- 1. Dr. Somnath Vitthal Panade, 2. Dr. Sachin Vaman Londhe ---------- ३५

९. **Historical Perspectives of Dalit Movement in India**

- Dr. S. B.Babare ---------- ३९

१०. **Scenario of Higher Education in Maharashtra**

- 1. Amol S. Kambale, 2. Prof. Dr. (Smt.) P. B. Patil, 3. Mr. S. R.Kundle -- ४३


Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist.Kolhapur

ISSN No. 2394-5990


११. **Dr. Bhimrao Ramji Ambedkar's Role as a Historian in the Dalit Movement : Few Key Observations**

- Pournima Gaikwad ---------- ५१

१२. **Empowering Half the Sky : A Comprehensive study on Feminism And Women's Development**

- Mrs. Prof. Pratibha Dattatraya Pudale ---------- ५५

१३. **Aspect of Women Empowerment & Human Right**

- Dr. Bodhale Champatai Shrirang ---------- ५९

१४. **Namdev Dhasal : A Pioneer of Ambedkarite Poetical Movement**

- Dr. Kamble Sachin Gundurao ---------- ६२

१५. **One Nation one election and its probable impact on the subaltern classes a historical analysis**

- 1. Prof. Dr. Arun V. Sonkamble, 2. Mr. Harshal S. Shinge ---------- ६५

१६. **"Cultivating Change : Exploring India's Diverse Agricultural Initiatives"**

- 1. Mugali A. P., 2. Patil B. D. ---------- ६९

१७. **Subaltern Narratives on Stage : A Study of Indian Women Playwrights**

- Mr. Nitish Pandurang Shinde ---------- ७६

१८. **Gender Issues in Urbanization in Maharashtra State of India**

- 1. Mr. Dasharath C. Jadhav, 2. Mrs. Anita D. Jadhav ---------- ८१

१९. **Geographical Study of Housing Conditions of Dange Tribal In-Migrants In Kolhapur City**

- 1. Mr. Ashish S. Jadhav, 2. Miss S. S. Shinde ---------- ८७

२०. **Religious Attitude of Rural People Across Generations**

- Dr. Vinod Kamble ---------- ९७

२१. **Role of NGOs in Rural Development**

- Mr. Sagar Raghunath Dehsamukh ---------- १०३


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist. Kolhapur

२२. Evolution of Data : From Data Analysis To Artificial Intelligence
- 1. S. S. Patil, 2. G. D. Satpute ---------- १०७

२३. Post Colonialism In Judith Wright's poem Bora Ring
- Ms. Shubhangi Nivrytti Lavate ---------- १११

२४. Tribal Movementsreflected in Louise Erdrich's 'Tracks'
- Mr. Shinde Santosh Laxman ---------- ११३

२५. वंचितांच्या शैक्षणिक, ग्रंथालयीन व समाज चळवळीचा आधार : कर्मवीर भाऊराव पाटील
- प्रा. डॉ. बिरू ज्ञानू राजगे ---------- ११७

२६. सार्वजनिक ग्रंथालय चळवळ : एक आढावा
- सौ. जिरगे आशा चंद्रशोक ---------- १२१

२७. कामगार चळवळीतील व्यक्तींचे योगदान
- डॉ. मोहन गोविंद लोंढे ---------- १२५

२८. उत्तम कांबळे यांच्या कथेतील वंचितांचे जीवन
- डॉ. मगदूम बळवंत मारुती ---------- १३०

२९. वंचित समाजातील स्त्रियांचा वांग्मयीन हुंकार म्हणजे दलित, आदिवासी स्त्रियांची कविता
- डॉ. सर्जेराव पद्माकर ---------- १३२

३०. ग्रामीण स्त्रियांवरील अत्याचाराचे स्वरूप, कारणे व उपाय
- १) प्रा डॉ. दिलीप महादू कोने २) प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम ---------- १३६

३१. 'झोपडपट्टी' कादंबरीतील वंचितांचा भाषिक व्यवहार
- प्रा. डॉ. आर. डी. कांबळे ---------- १४०

३२. मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील वंचित दलितांचे जातभान
- प्रा. मोहन बाबुराव चव्हाण ---------- १४४

३३. दिनेश काळे यांच्या कादंबरीतील स्त्री-प्रतिमा
- १) प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम २) प्रा.डॉ.दिलीप महादू कोने ---------- १४९

३४. शिक्षक भरती प्रक्रिया सद्यस्थिती
- १) प्रा. सुनिता भारत थोरबोले २) प्रा.डॉ.दिलीप महादू कोने ---------- १५३

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist.Kolhapur

ISSN No. 2394-5990


३५. आदिवासी चळवळी विशेष संदर्भ : महाराष्ट्र

- प्रा. अर्जुन वंडू राठोड ---------------------------------------------- १५८

३६. 'उगवाई' नियतकालीकातील कथांमध्ये आलेला स्त्रियांचा संघर्ष

- प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर ---------------------------------------- १६३

३७. महाराष्ट्रातील शेतकरी, कामगरांचे जागतिक प्रगतीत योगदान

- प्रा. सचिन पोपट सवने ---------------------------------------------- १६७

३८. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणविषयक विविध योजना

- प्रा.डॉ.संजीव सुखलाल बोडखे ---------------------------------------- १७२

३९. पंडिता रमाबाईच्या जडणघडणीतील अनंतशास्त्री डोंगरे यांचे योगदान

- प्रा. डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले---------------------------------------- १७६

४०. पेशवेकालीन विवाहविषयक कागदपत्रे – सबाल्टर्न (वंचित) इतिहासलेखनाचे महत्त्वाचे दस्तऐवज

- डॉ. रामचंद्र वसंत कुंभार ---------------------------------------------- १८०

४१. गांधीवादी आदिवासी नेत्या राजमोहिनी देवी

- डॉ. सुरेश वसंत शिखरे ---------------------------------------------- १८४

४२. प्रचितगडाचा इतिहास

- १) डॉ. सोनावाले राजेंद्र रघुनाथ, २) प्रा. कुंभार भाग्यश्री शामराव --------------- १८७

४३. किल्ले प्रतापगड : इतिहास व ऐतिहासिक वास्तू

- प्रा. डॉ. विश्वनाथ पवार ---------------------------------------------- १९०

४४. वंचित इतिहासाच्या परिप्रेक्षातून दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीत योगदान

- १) डॉ. हाजी नदाफ २) डॉ.रणजीत माने ------------------------------------ १९४

४५. इतिहासलेखन प्रवाहातील योगदान सबाल्टर्न स्टडीजचे

- १) प्रा. डॉ. बाळासाहेब नानासाहेब देवकाते २) मानसी विलास भोसले ------------ १९९

४६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सायमन कमिशन

- प्रा. डॉ. बाळासो निवृत्ती कर्पे ---------------------------------------- २०३

४७. स्वातंत्र्यसैनिक शिवलाल त्रिलोकचंद पोरवाल : अज्ञात भारतीय स्वातंत्र्यसैनिकाचा शोध

- प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश ---------------------------------------- २०६




Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist.Kolhapur

४८. सबाल्टर्न इतिहास : अर्थ, स्वरूप व मर्यादा

- डॉ. डी. ई. मनेरे ---------- २१२

४९. महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील धार्मिक परंपरा : एक अभ्यास

- प्रा. डॉ. दत्तात्रय रामचंद्र डुबल ---------- २१६

५०. वंचितांचे उद्धारक महात्मा फुले

- प्रा. डॉ. काशिलींग रघुनाथ गावडे ---------- २२१

५१. आदिलशाही काळातील श्री. सिध्दनाथ देवस्थान आलेगाव

- डॉ. रावसाहेब तुळशीराम गडहिरे ---------- २२६

५२. स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील स्त्रीविषयक दृष्टीकोन

- १) डॉ. शितल चंद्रकांत पाटील २) डॉ. सचिन श्रीरंग चव्हाण ---------- २३०

५३. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित चळवळीमधील आणि दलित पँथर चळवळीतील स्त्रियांचा सहभाग

- प्रा. कल्पना सुनील गुरव ---------- २३४

५४. मोहोळ तालुक्याला लाभलेला ऐतिहासिक वारसा

- १) भगत रेशमा मारुती २) डॉ. गायकवाड एस.एस. ---------- २३७

५५. शाहीर विश्वासराव फाटे आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ

- महेश जगन्नाथ साखरे ---------- २४१

५६. कळसूबाई एक आदिवासी लोकदेवता व बाह्य संस्कृतीचे संक्रमण

- श्रध्दा सुधीर वाघमारे ---------- २४५

५७. श्री गेनसिद्ध मंदिर, सोलापूर

- १) गोपाळ आडीअप्पा यरगल २) प्रा.डॉ. चंद्रकांत सी.चव्हाण ---------- २५०

५८. स्त्रीवादी चळवळीचे कार्य; हिंसाचार आणि लिंगभाव

- डॉ. चव्हाण मनिषा शिवाजी ---------- २५४

५९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीव्यवस्थेबाबतचे निर्मूलन

- डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर ---------- २५७

६०. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची बहिष्कृत भारत आणि मूकनायक वृत्तपत्रे

- डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर ---------- २६०



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist.Kolhapur

ISSN No. 2394-5990


६१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्तीतील योगदान

- डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर ---------- २६४

६२. महिला सक्षमीकरणा मध्ये 'मदर इंडिया' चित्रपटाचे योगदान

- १) गडगे शांता रंगनाथ २) डॉ. के.एम. अंबाडे ---------- २६७

६३. सांख्यिकी शास्त्रज्ञ सी. आर. राव यांच्या संशोधनाचे मूल्य

- विजय कोष्टी ---------- २७०

६४. स्त्रीवादी चळवळ

- कु. योगिता रामचंद्र रेवडे ---------- २७४

६५. स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांचे योगदान

- प्रा. रामदास रमेश वसावे ---------- २७७

६६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : महिला सक्षमीकरण विचार व सद्यस्थिती

- १) मोनाली सिध्दार्थ लोंढे, २) प्रा. डॉ. संजय गायकवाड ---------- २८१

६७. दलित चळवळीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा सामाजिक दृष्टिकोनातून चिकित्सात्मक अभ्यास

- १) रोशनी बाबुराव कांबळे, २) प्राचार्य डॉ.अशोक केशवराव सपाटे ---------- २८५

६८. भारतीय इतिहासलेखन आणि सबाल्टर्न इतिहासलेखन परंपरा

- १) डॉ. मल्लिकार्जुन बंदारे, २) डॉ. हाजी नदाफ ---------- २९०

६९. स्वातंत्र्यसैनिक डॉ. सत्यवती लिमये

- प्रा. कल्याण जयसिंगराव चव्हाण ---------- २९४

७०. स्त्री – जीवनाचे विविध पैलू

- १) डॉ. उज्वला पाटील, २) प्रा. डॉ. विश्वनाथ पवार, ३) डॉ. राजेंद्र सोनावले ----- २९८

७१. इतिहासातील नवविचारप्रवाह दृष्टीकोन या संदर्भात वंचितवादी इतिहास लेखन प्रवाहाचे चिकित्सक परिक्षण

- प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम ---------- ३०२

७२. ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाची भूमिका

- १) एस. आर. कुंडले २) डॉ. पी. बी. पाटील ३) डॉ. ए.एस. कांबळे ---------- ३०६




Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon
Dist. Kolhapur

७३. चंदगड तालुक्यातील शेतमजुरांचा आर्थिक अभ्यास

- डॉ. के. पी. वाघमारे ---------- ३१०

७४. जिरायती व बागायती शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास

- प्रा. सविता रामचंद्र रेवडे ---------- ३१५

७५. कृष्णा सोबती के साहित्य में शोषित एवं उपेक्षित नारी

- डॉ. कदम संदिप तानाजी ---------- ३१७

७६. गोंड आदिवासी जमाती के प्रमुख और समाजक्रांती के प्रणेता – "बिरसामुंडा"

- आशा बुधराम मडावी ---------- ३२०

७७. दूधनाथ सिंह तथा ज्ञानरंजन की कहानियों में नारी विमर्श

- श्रीमती. ज्योती एकनाथ गायकवाड ---------- ३२२

७८. "हिंदी कथा–साहित्य : नारी विमर्श"

- लेफ्टनंट डॉ. रविंद्र पाटील ---------- ३२७

७९. 21 वीं सदी के हिंदी उपन्यासों में आदिवासी आंदोलन

- डॉ. श्रीकांत पाटील ---------- ३३०

८०. सर्वेश्वर दयाल सक्सेना के काव्य में सामाजिक मूल्य विघटन

- डॉ. भोसले काकासाहेब बापूसाहेब ---------- ३३४

८१. आत्मकथाओं में चित्रित दलित चेतना

- श्रीमती खुडे शुभांगी मनोहर ---------- ३३८

८२. स्त्री वेदना और विद्रोह की कहानी : 'नगाड़े की तरह बजते है शब्द'

- डॉ. युवराज माने ---------- ३४१

८३. भारतीय दलित आंदोलन और हिंदी साहित्य

- प्रा. डॉ. संजय य. चोपडे ---------- ३४४

▲▲▲

ISSN No. 2394-5990

# वंचित समाजातील स्त्रियांचा वाङ्मयीन हुंकार म्हणजे दलित, आदिवासी स्त्रियांची कविता

**डॉ. सर्जेराव पद्माकर**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव
जिल्हा. कोल्हापूर मो. ८३२९८१२०१२
भ्रमणध्वनी क्र. ९०११७७८७७००
sarjeraopadmakar@gmail.com

**प्रास्ताविक :**

भारतीय समाजाचा आणि पर्यायाने समाजजीवनाचा विचार करता अनेकविध जीवन प्रणालींचा देश म्हणून भारतीय समाज जगाच्या पाठीवर अत्यंत वेगळ्या पद्धतीने स्वतःची ओळख असलेला देश म्हणून सर्व परिचित असल्याचे आपणास लक्षात येते.अनेक भाषा, अनेक धर्म, अनेक जाती, विविधरुपी संस्कृती इत्यादी विशेषाने समृद्ध असलेला व विविधतेत एकता असणारा देश म्हणून भारताची जनमानसातील ओळख असल्याचे दिसून येते.भारतावर अनेक वर्ष इंग्रजांचे राज्य होते जवळजवळ दीडशे वर्षे आपला देश गुलामीत होता. १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला व स्वतंत्र देशाची या सर्व विविधतेत विखुरलेल्या अनेक बाबींना एकत्र बांधून ठेवणारी भारतीय राज्यघटना तयार झाली आणि म्हणून अनेक धर्म, पंथ, जाती, भाषा, संस्कृती असतानाही एकसंघ असणारा देश म्हणून भारताची ओळख असलेली दिसून येतेतथापि भारत स्वतंत्र झाला असला तरी प्राचीन कालखंडामध्ये प्रबळ असलेली वर्णश्रेष्ठत्व आणि जाती श्रेष्ठत्वामुळे माणसा माणसांमध्ये भेद करणारी समाजव्यवस्था आजही छुप्या पद्धतिने का होईना ती अनेक जातीसमूहाच्या मनात जिवंत असलेली दिसते की ज्या व्यवस्थेने अनेक समूहाला वंचिततेच्या भावनेला सामोरे जायला लावले आहे.माणूस असूनसुद्धा सर्व माणसांना आवश्यक असणाऱ्या माणूसपणापासून वंचित रहावे लागले आहे म्हणजेच भारत हा जगात अत्यंत बलाढ्य देश म्हणून जरी वावरत असला तरी त्याच्या आतमध्ये अशा सुस्तीतीत आणि वंचित घटकांचा समावेश आहे हे दुर्लक्षित करता येत नाही.

**वंचित समाज संकल्पना :**

मानव समाज हा समूहरूपाने स्वतःची जीवनप्रणाली अंगीकारलेला समाज म्हणून त्याची ओळख आहे ज्यामध्ये तो जगताना त्याने त्याच्या जीवन सुव्यवस्थेसाठी अनेक प्रकारच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय,आर्थिक इत्यादी संकल्पना निर्माण केलेल्या आहेत या सर्व तयार करण्यापाठीमागे एकच उद्देश होता की माणसाचे जीवन सुसह्य व्हावे, आनंदी व सुखी व्हावे मात्र या सर्व संकल्पना संपूर्ण मानवी समूहासाठी असताना सुद्धा काही समाज घटकांना अशा प्रकारच्या सोयी सवलती आणि अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले आहे जे श्रेष्ठ कनिष्ठतेच्या चुकीच्या विचारधारेवर ते माणूस असूनसुद्धा संपूर्ण माणसासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींपासून बाजूला करण्यात आले आहे व एक मोठा समूह या जीवनावस्थेत जगताना दिसतो त्यामुळे जगण्याच्या अनेक अधिकारापासून वंचित राहिलेला जो समाज आहे त्याला वंचित समाज असे संबोधले जाते.

**वंचित स्त्रियांची समाजस्थिती :**

'न स्त्री स्वातंत्र्य मर्हती'या वुक्तीप्रमाणे पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना वंचिततेची वागणूक दिलेली आहे. मनुस्मृतीमध्ये तर तिच्या सर्व अधिकारांवर गंडांतर आणले आहे. मूलतः स्त्री हीसुद्धा माणूस आहे हे वास्तव जाणीवपूर्वक नाकारून आपली पुरुषप्रधान समाज व्यवस्था काही अपवाद वगळता त्याच पद्धतीने जगताना दिसते. स्त्रीने मोठ्याने बोलायचे नाही, मोठ्याने हसायचे नाही, एकटे घराबाहेर पडायचे नाही, घराबाहेर राहायचं नाही, विधवा स्त्रीने शुभकार्यात भाग घ्यायचा नाही, रात्री उशिरा बाहेर थांबायचे नाही, स्वतंत्रपणे आपले विचार मांडायचे नाहीत, घरातील पुरुषांच्या पूर्व परवानगीनेच कोणतेही काम करायचे इत्यादी अनेक बाबतीत तिचे स्वातंत्र्य अडचणीत आल्याचे आपल्या लक्षात येते.सध्या आपल्या आजूबाजूला आपण जर दृष्टीक्षेप टाकला तर काही अपवाद वगळता आपणास अशाच पद्धतीची परिस्थिती, जीवनप्रणाली आजूबाजूला पहावयास मिळते म्हणजेच स्त्रीला प्रत्येक वेळी पुरुषांवर अवलंबून



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon
Dist.Kolhapur

राहण्यासाठी तिला परावलंबी बनवल्याचे दिसून येते. म्हणजेच तिने लहानपणी वडिलांच्या, तरुणपणी नवऱ्याच्या व म्हातारपणी मुलाच्या अधिकाराखाली दबून राहावे लागते अशी समाजस्थिती निर्माण झाल्याचे दिसते म्हणजेच आपल्या समाजामध्ये स्त्री ही सर्वार्थाने वंचित असल्याचे लक्षात येते.

**वंचित स्त्रियांचे वाङ्मय :**

पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने वंचित ठेवलेले स्त्रियांना भारतीय राज्यघटनेने शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कायद्याने लिहिण्या-वाचण्याचा अधिकार दिला आहे जो अधिकार प्राचीन कालखंडात तिला न्हवता, जो मनुस्मृति काळात त्याला अनेक अंधश्रद्धामय नियमांमुळे काढून घेतला होता लिहिण्या वाचण्याने तिला मस्वफ ची ओळख झाली माणूस असण्याची ओळख झाली व ती लेखणीच्या माध्यमातून का असेना मानवतावादाची मांडणी करताना दिसते या व्यवस्थेत ती दुय्यम आणि बऱ्याच गोष्टींपासून वंचित आहे. हे दुय्यमत्व, वंचितता ही लेखणीच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करताना ती दिसते मग यामध्ये स्त्री म्हणून जन्माला आलेल्या सर्व स्त्रिया आहेत शिवाय या समाज व्यवस्थेतील ज्या स्त्रिया जास्त प्रमाणात स्वातंत्र्यापासून वंचित ठेवल्या गेल्या आहेत अशा दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त स्त्रियांनीसुद्धा आपल्या जीवनानुभवांना आणि विचारांना साहित्याच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करण्याचा प्रयत्न केला असल्याचे आढळून येते.

**दलित स्त्रियांचे वाङ्मय :**

मराठी साहित्याचा म्हणजेच वांग्मयीन प्रवासाचा विचार करता साठोत्तरी कालखंडात दलित साहित्याने स्वतःची एक वैचारिक ओळख निर्माण केल्याचे दिसून येते. फुले आंबेडकरी विचारधारा प्रमाण मानून व तीच प्रेरणा घेऊन या साहित्याने मानवतावादी विचाराचे, समता प्रस्थापित करण्यासाठीचे साहित्य निर्माण केले आहे,यामध्ये पुरुष लेखकांबरोबरच स्त्रियांनीही कमीअधिक प्रमाणात साहित्य लेखन केले आहे ज्यामध्ये कथा, कविता, नाटक, कादंबरी, आत्मकथने तसेच वैचारिक वांग्मय सुद्धा लेखिकांनी हाताळले आहे. या सर्व लेखनामध्ये त्यांनी आम्हालाही माणूस म्हणा हा आत्मस्वर नेहमी आळवलेला दिसतो. हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, उर्मिला पवार, संध्या रंगारी, प्रज्ञा पवार, उषा हिंगोणेकर, आशालता कांबळे, उमा गवई, यशोधरा गायकवाड,शिल्पा कांबळे, करुणा जमदाडे इत्यादी लेखिकांनी आपल्या साहित्यातून फुले आंबेडकरांना अपेक्षित असणारी मानवतावादी विचारभूमिका मांडलेली दिसून येते. सिसिलिया काव्हाल्हो या आपल्या कवितेत स्त्रीचे दुःख मांडताना म्हणतात

किती आठवायचा प्रयत्न केला
पण आठवतच नाही तुझा चेहरा
टच भरलेले डोळे तेवढे आठवतात
बाकी तुला चेहराच नाही[१]

या कवितेच्या चार ओळी जर बघितल्या तर स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या दुःखाची एक संवेदनशील माणूस म्हणून आपणास जाणीव झाल्याशिवाय राहत नाही.अशा पद्धतीचा एक वेगळा विचार व स्त्रीच्या अस्तित्वाविषयी बोलताना कवयित्री उमा गवई म्हणते

तिचं आणि त्याचं
असं एक घर होतं
भिंती होत्या तिच्यासाठी
त्याचं मात्र दार होतं[२]

थोडक्यात स्त्री-पुरुष हे मानव जातीच्या पोटी जन्माला येऊनसुद्धा पुरुषी व्यवस्थेने स्त्रीला कसे वंचित ठेवले आहे हे आपल्या लक्षात येते. त्रास सहन करणे एवढंच तिच्या हातात राहत. बऱ्याच बंधनात ती स्वतःला गाडून घेते म्हणजे तिला सतत या व्यवस्थेतील वंचिततेचा अनुभव घ्यावा लागतो. गवई पुढे एका कवितेत आपलं दुःख मांडताना म्हणतात

दिसत नाही कुणालाही
रक्ताळलेली खोल खोल जखम
कपाळावरच्या लाल कुंकवाखाली दडलेली[३]

दलित स्त्रीला दुहेरी पद्धतीने अन्यायाला सामोरे जायला लागते एक म्हणजे इथल्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्री म्हणून असणारे दुय्यमत्व आणि दुसऱ्या बाजूला इथल्या वर्णव्यवस्थेतील दलित या अस्पृश जातीचं दुय्यमत्व म्हणून स्त्री ही समाज व्यवस्थेतील दुय्यम आणि अनेक प्रकारच्या जगण्यापासून वंचित असणारी अशीच तिची ओळख असलेली आपल्या लक्षात येते अनेक कवयित्रीने आपल्या कवितेतून हे दुःख मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो हिरा बनसोडे म्हणतात

अंधारात राहायची सवय झाली की
प्रकाशाची आवडच नाहीशी होते[४]

अशा शब्दात स्त्रीला किती दहशतीखाली राहावे लागते हे सांगताना दिसतात. प्रज्ञा पवार एके ठिकाणी लिहितात

बाई शोधते तिचा हरवलेला चेहरा
बाई शोधते तिचं हरवलेलं शरीर
बाई शोधते तिची फक्त तिची सावली[५]

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीचं अस्तित्व शून्य झाल्याने तिला तिचाच चेहरा आणि सावली शोधावी लागते असं कवयित्री म्हणते स्त्रियांना गुलामासारखं वागवायचं आणि तिला ते समजू



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist. Kolhapur

ISSN No. 2394-5990

...ाये म्हणून अनेक वेगवेगळ्या गोंडस प्रतिकांमध्ये अडकवून ठेवायचं या पुरशीकृतीला उत्तर देताना कवयित्री म्हणते

हे असं क्षणाची पत्नी
आणि
अनंत काळाची माता वगैरे असण्यापेक्षा
स्त्रीने
अनंत काळी माणूसच असावं
अंतर्बाह्य[५]

प्रज्ञा पवार यांच्या या कवितेच्या ओळीतून स्त्रीला वंचित ठेवणाऱ्या अवस्थेला आपण झिडकारून देऊन माणूसपणासाठी आतुर असायला हवं हे सांगते हे दिसते. सुरेखा भगत या कवयित्रीनेसुद्धा स्त्रीत्वाबद्दल आपले विचार कवितेतून मांडले आहेत. स्त्रीच्या वंचिततेच्या अवस्थेचे वर्णन त्यांच्या विविध कवितेतून येताना दिसतात

काचेची वस्तू म्हणून की काय
काचेच्या बांगड्यांचे तिच्यावर बंधन आलं
काचघरातल्या मॉडेलसारखं राहणं आलं[७]

वेगवेगळ्या बंधनाखाली स्त्रीला बंदिस्त ठेवण्याच्या प्रवृत्तीला कवयित्री आपल्या शब्दातून व्यक्त करताना तिच्या अस्तित्व शून्यतेच वर्णन करताना दिसते.

**आदिवासी स्त्रियांची कविता :**

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये अनेक अर्थाने माणूसपणापासून वंचित ठरलेली म्हणून आपण स्त्रियांच्या दुःखाचा विचार केला पाहिजे तसेच जात, धर्म, पंथ,वर्णश्रेष्ठत्वामुळेसुद्धा स्त्रियांच्या दुःखात भरत पडलेली दिसून येते. नागरी व शहरी जीवनापासून वंचित असलेल्या आदिवासी समाजाचे दुःख वेगळेच असलेले आपणास दिसून येते. या समाजामध्येसुद्धा शिक्षणाच्या आगमनाने (प्रमाण कमीच आहे) वांग्मयलेखन झालेले दिसून येते. पुरुष लेखकांबरोबरच स्त्रियांनीही साहित्य लिहिले आहे. कुसुम आलाम, उषाकिरण आत्राम इत्यादी कवयित्रींचा यामध्ये समावेश होतो. आदिवासी समाजाचे वर्णन करताना कुसुम अलाम म्हणतात

वस्त्र म्हणावे तर लंगोटी
स्त्रियांसही ना अंगभर साडी
छातीस चिकटती पोरे नागडी
बघे तयाला म्हणती संस्कृती[८]

प्रस्तुत कवितेच्या ओळीतून सर्वसामान्य माणसांपासून आदिवासी समाज किती वंचित आहे हे सांगितले आहे. माणसाच्या मूलभूत गरजासुद्धा भागवता येत नाहीत असे जिने आदिवासींच्या वाट्याला आलेले आहे. त्यातही स्त्रियांची अवस्थासुद्धा अत्यंत दयनीय अशीच आहे हे त्या सांगून तरीसुद्धा याला आपण भारतीय संस्कृती म्हणायचे का? हा अत्यंत गंभीर प्रश्न कवयित्री विचारताना दिसते. व्यवस्थेने स्त्रीला गुलाम बनवले आहे,तिला दुःखाच्या खाईत लोटले आहे अशा स्त्रीदुःखाचं वर्णन करताना कवयित्री म्हणते

मेघांनो तुमचं ठीक आहे
तुम्हाला गरजताही येते
मनासारखे कधीही बरसता येते
स्त्रीचे मात्र तसे नाही[९]

वेगवेगळ्या प्रकारच्या बंधनांमध्ये जखडून ठेवलेल्या स्त्रीचे दुःख कवयित्री या कवितेतून सांगताना दिसते.एकूणच या समाजव्यवस्थेत स्त्रीला एक 'स्त्री'म्हणून अनेक प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागते आहे म्हणजेच ती माणूस असूनसुद्धा तिला अनेक अधिकार, मानव्याच्या गोष्टीपासून वंचित राहावे लागते आहे हे तिचे आजचे वास्तव आहे.

थोडक्यात आज सर्वच सामाजिक थरातील शोषित, पीडित स्त्रिया लिहू लागलेल्या आहेत.आपल्या दुःखाला उजागर करताहेत यामध्ये आदिवासी, भटक्या, विमुक्त स्त्रियाही आहेत (विमल मोरे, जनाबाई गिऱ्हे, नजुबाई गावित इत्यादी) ज्या आपल्या अनुभवी विश्वातून स्त्रियांभोवतीच वास्तव जग मांडताना दिसत आहेत.

**संदर्भ**

१. सिसिलियाकार्व्हालो - अंतर्यामी अभिरुची प्रकाशन, मुंबई, १९९८, पृष्ठ८.
२. उमागवई– पाचवीभिंत, कैलासपब्लिकेशन, औरंगाबाद, २००७, मनोगत.
३. उमागवई– पाचवीभिंत, कैलासपब्लिकेशन, औरंगाबाद, २००७, पृष्ठ३८.
४. हिराबनसोडे– फिनिक्सडिंपल पब्लिकेशन, वसईरोड, २००९,पृष्ठ३७.
५. प्रज्ञापवार–उत्कट जीवघेण्या धगीवर, लोकवांग्मयगृह, मुंबई, २००२, पृष्ठ५०.
६. प्रज्ञापवार–मीभिडवू पाहते समग्रशीडोळा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,२००७, पृष्ठ१०.
७. सुरेखाभगत - साक्ष, प्रशांत प्रकाशन, बुलढाणा, १९९४, पृष्ठ५८.
८. कुसुमआलाम -रान आसवांचे तळे, आलापल्लीगडचिरोली, १९९८, पृष्ठ४१.
९. कुसुमआलाम - रानआसवांचे तळे, आलापल्ली गडचिरोली, १९९८, पृष्ठ ४२.

■■■



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist.Kolhapur

# वंचित इतिहासाच्या परिप्रेक्षातून दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीत योगदान

१) डॉ. हाजी नदाफ
Hdnadaf80@gmail.com
मोबाईल क्र. - ९७६७९५२१३२

२) डॉ.रणजीत माने

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय पेठ वडगाव,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.-४१६११२

**प्रस्तावना :**

ब्रिटिश सत्तेच्या प्रभावातून भारतीय रूढी व परंपरेत बदल घडून आले. या बदलातून स्त्रियांनाही समाजामध्ये पुरूषांच्या बरोबरीने हक्क व अधिकार टप्याटप्याने मिळत गेले. स्त्रियांच्या सहभागाशिवाय सामाजिक, आर्थिक व राजकीय बदल शक्य नाही या जाणिवेतून स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीत सहभाग करून घेण्यास सुरुवात झाली.भारतामध्ये ब्रिटिश साम्राज्यापासून देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी विविध टप्यावर विविध संघटना कार्यरत होत्या. मात्र या संघटना विशिष्ठ वर्गापुरत्याच मर्यादित असल्याने व या संघटनेस बहुजनांचा पाठिंबा नसल्याने त्यांचे बळ वाढले नाही,त्यामुळे या चळवळीचे यश मर्यादित राहिले. मात्र १९२० नंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधीचा उदय झाला. गांधींनी प्रथम संपुर्ण देश पायी चालून भ्रमण केले त्यावेळीच त्यांच्या लक्षात आले की, खरा भारत खेडयात आहे व हा चळवळीपासून अनभिज्ञ व वंचित आहे. जोपर्यंत यांना चळवळीमध्ये सामावून घेतले जात नाही तोपर्यंत आपला प्रभाव व ताकद वाढणार नाही हे गांधीच्या लक्षात आले व त्यांनी शेतकरी, कामगार, महिला यांना आवाहन करून त्यांच्यात जागृती निर्माण केली. घराबाहेर न जाणाऱ्या स्त्रिया, नेहमी बुरखा वापरणाऱ्या स्त्रिया, तरूण माता, विधवा, अविवाहित मुली सर्वजण गांधींच्या प्रेरणेने चळवळीत सामिल झाल्या. आंदोलन, निदर्शने व मोर्चे काढून तुरूंगवास ही सहन करू लागल्या. कित्येक महिलांनी गांधीच्या या प्रभावातून आपले संपुर्ण आयुष्य देशसेवेसाठी अर्पण केले.आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आपला सहभाग नोंदविला.अशा स्त्रियांच्या कार्याचे मूल्यमापन करावे ही आजची गरज असल्याने प्रस्तुत लेखामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीत दक्षिण महाराष्ट्रातील काही ज्ञात व अज्ञात स्त्रियांच्या कार्याचे अवलोकन केले आहे.

**स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया आणि सबाल्टर्न दृष्टीकोन :**

इ.स.१९८५ नंतरच्या काळात इतिहास लेखनाचा सबाल्टर्न दृष्टीकोन लोकप्रिय होऊ लागला. सबाल्टर्न गटाच्या इतिहासकारांनी वंचित किंवा दुय्यम समूहांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते राष्ट्रवादी दृष्टीकोनातून केलेले इतिहासलेखन हे 'अभिजनवादी' असते. त्यांचा आरोप होता की राष्ट्रवादी इतिहासकारांनी आपल्या मांडणीत 'अभिजनवादी नेतृत्वाला' खूप महत्त्व दिले.त्यांच्या इतिहास लेखनामध्ये स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या शेतकरी, कामगार, आदिवासी, तत्समजाती-जमाती आणि स्त्रिया यांच्या कार्याचा उल्लेख क्वचितच झालेला आढळतो. मात्रतळागाळातील समाजाच्या घटकांबद्दल लिहून त्यांना इतिहासात जागा मिळवून देण्याच्या हेतूने सबाल्टर्न इतिहासकार लिखाण करू लागले.

सबाल्टर्न गटाच्या इतिहासकारांनी स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भात एक सैद्धांतीक मांडणी केली आहे. ती ही की, भारतीय स्वातंत्र्य लढा हा एकसंध स्वरूपाचा नव्हता. त्यांच्यामते राजकारणाची दोन क्षेत्रे होती- अभिजन क्षेत्र आणि सबाल्टर्न क्षेत्र. ही दोन्ही क्षेत्रे वेगवेगळी असली तरी त्यांचा एकमेकांवर प्रभाव पडतो. अभिजन क्षेत्राकडून सबाल्टर्न क्षेत्राला नियमित/नियंत्रित करण्याचे प्रयत्न केले जातात. म्हणजेच वास्तविक अभिजन लोकांनी वंचित व दुय्यम समूहातील लोकांचा ब्रिटीशविरोधी लढ्यात उपयोग करून घेतला. स्वातंत्र्यलढ्यात अशा अनेक घटना घडल्या ज्यामध्ये कामगार, शेतकरी, आदिवासी या सारख्या दुय्यम आणि वंचित समूहांनी सहभाग घेतल्याचे दिसून येते. सबाल्टर्न गटाचे इतिहासकार सर्वजाती-जमातींच्या स्त्री वर्गाला देखील 'सबाल्टर्न' (वंचित, दुय्यमसमूह) समजत असल्यामुळे ही मांडणी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या स्त्रीवर्गाला देखील लागू होते.



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist.Kolhapur

ISSN No. 2394-5990

**भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहास लेखनातील वंचितता:**

भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक लोकांनी बलिदान दिले आहे. लहानांपासून मोठ्यापर्यंत सर्वजण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आसुसलेले होते. त्यात महिलादेखील मागे नव्हत्या. त्यांनी आपल घर, कुटुंब ही जबाबदारी सांभाळताना स्वातंत्र्य चळवळीतही सहभाग नोंदविला. ज्यांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढा दिला, त्रास सहन केला, त्या महिलांचे योगदान विस्मृतीत गेले आहे. ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, अरुणा असफअली इ. प्रसिद्ध महिलांच्या कार्याचा उल्लेख मिळतो. पण प्रादेशिक आणि स्थानिक पातळीवरील बहुतांशी स्त्रियांना आजही इतिहासलेखनात अदृष्य ठेवले गेले आहे. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ मोठ्या शहराप्रमाणे तालुका, गाव, खेडे, वाड्या-वस्त्या, भटक्या आणि आदिवासींच्या जंगलापर्यंत विस्तारली होती. यात प्रौढ, तरुण, मुले ते अबाल वृद्ध स्त्री-पुरुषांचा समावेश होता. वसाहतवादी धोरण सुरु झाल्यापासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत ही चळवळ सुरु होती. त्यामुळे भारतीय इतिहासावर या चळवळीचा दूरगामी परिणाम दिसून येतो. अभ्यासाच्या पातळीवर याचा साचेबद्ध अभ्यासही झाल्याचे दिसते. पण त्यातील अनेक महत्वाचे आणि कळीचे मुद्दे अभ्यासल्याचे दिसत नाही. अशाच काही महिलांबद्दल आज चिंतन होणे गरजेचे आहे.

**स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांची भूमिका :**

स्वातंत्र्यलढ्याच्या पहिल्या पर्वात फारच थोड्या स्त्रियांचे उल्लेख मिळतात. १९०५ च्या वंगभंग आंदोलनानंतर स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा सहभाग वाढत गेला. ऑगस्ट १९४२ च्या ङ्गभारत छोडोफ घोषणेनंतर प्रमुख राजकीय नेते तुरुंगात गेल्यावर ङ्गप्रत्येक नागरिकांनी आपण स्वतंत्र झालो आहे असे समजून स्वातंत्र्यलढ्यामध्ये क्रियाशील बनावेफ हा गांधींचा संदेश अनेक युवक युवतींना प्रेरणादायी ठरला. ही स्वातंत्र्याची प्रेरणा घेऊन दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रिया पुरुषांप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवला होता. याकालखंडातील अनेक स्त्रियांना कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमी होती. या कालखंडात स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत सहभाग होण्याचे प्रयत्न होण्यास सुरुवात झाली होती. भारतातील बहुतेक भागातील स्त्रिया स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी होत्या. कोणताच प्रांत स्त्रियांच्या चळवळीविना खाली नव्हता. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, राजस्थान, जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, ओरिसा, बंगाल, आसाम, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश असे सर्वच प्रांत व त्यातील स्त्रिया स्वातंत्र्याच्या चळवळीत मुख्य भूमिकेत तर कधी सहकार्याच्या भूमिकेतसहभागी होत्या. त्यांचे संघटनाचे जाळे भारतभर पसरले होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत वेगवेगळ्या माध्यमातून प्रत्यक्षात भाग घेतलेल्या या स्त्रियांनी तुरुंगात गेलेल्या कार्यकर्त्यांच्या मुला-बाळाला आधार देणे, त्यांचे संसार चालविणे, क्रांतीकारकांना आपल्या घरात आश्रय देणे, निराधार लोकांना अन्न-पाणी पुरवणे, संग्रामात आवश्यक असलेली शास्त्रांची ने-आण करणे, कैदेत असताना साक्षरता वर्ग घेणे, रझाकारांच्या छावण्या जाळणे, बंदुका चालवणे अशा प्रकारची कामे केली. आणिआशाप्रकारच्या मुक्ती आंदोलनात स्त्रियांनी आपला सहभाग नोंदविला.

**महाराष्ट्रातील स्त्रिया आणि स्वातंत्र्यलढा :**

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील आपणाला काही स्त्रियांचीनावे माहित असतील. पण यापेक्षा खूप मोठ्या संख्येने स्वातंत्र्याच्या चळवळीत स्त्रियाचा सहभाग होता. यात आपण उदाहरणार्थ हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्त्रियांचे कार्य पाहिले तरी स्त्रियांचे कार्य आपल्या लक्षात येईल. या संग्रामाच्या काळात रुक्मिणीबाई विठ्ठल कोरडे यांनी इ.स. १९३१ च्या जंगल सत्याग्रहात सक्रीय सहभाग नोंदविल्याबद्दल त्यांना ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागली होती, तसेच त्या बरोबरच त्यांनी वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतल्याने इ. स. १९४१ मध्ये त्यांना ८ महिने कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. १ ते ३ जून १९३८ रोजी हैद्राबाद मुक्ती संग्रामासाठी महाराष्ट्र परिषद संपन्न झाली. त्यात महिलांनी विशेष सहभाग नोंदविला. यात काशिबाई किर्लोस्कर, सुशीलाबाई दिवान, गौरी किर्लोस्कर, कमलाबाई किर्लोस्कर, इंदुबाई शर्मा, गोदावरी दास यांचे प्रबोधनकारी कार्य विशेष महत्वाचे आहे. अशा हजारो कार्यकर्त्या हैद्राबाद मुक्ती संग्रामात कळीची भूमिका निभावत होत्या.

१९३०-३२ च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत विदर्भातील स्त्रियांनी महत्वाची कामगिरी पार पडली.बुलढाना, अकोला, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यातील स्त्रियांनी म. गांधींच्या सांगण्यानुसार स्वातंत्र्याचे प्रचार दौरे काढले. दुर्गाबाई जोशी, रुक्मिणी कोरडे, इंद्राबाई गद्रे, कमलबाई रेगे, रमाबाई केळकर, उमाबाई देशमुख इत्यादी महिलांनी मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्यागृह इत्यादी सत्याग्रह करून मोठी कामगिरी केली. निफाड तालुक्यातील अयोध्याबाई लक्ष्मण मोरे यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत भूमिगत राहून कार्य केले. अकोला येथील गोयांकाबाई यांनी सरकारने बेकायदा ठरविलेल्या कॉंग्रेस मैदानात जाऊन १९४२ च्या आंदोलनात राष्ट्रध्वज लावण्याचा प्रयत्न केला होता. त्यांना त्याबद्दल सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. ऑगस्ट


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist Kolhapur

१९४२ च्या चळवळीत सोलापूर येथे द्वारकाबाई देशपांडे, सुमतीबाई शाह, जनाबाई जाधव, कलावंती भोसले यांचे कार्य महत्वाचे आहे. सुमतीबाई शाहच्या शाळेत शिकणारी विद्यार्थीनी राजमती पाटील यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत उघडपणे सहभाग घेतला, त्यांना त्यात अटक झाली व येरवडा कारागृहात ठेवण्यात आले होते. ही विद्यार्थिनी पुढे साताऱ्याच्या प्रतीसरकारमधील प्रसिद्ध क्रांतिकारक म्हणून पुढे आली.

९ ऑगस्ट १९४२ च्या आंदोलनाचा स्फोट मुंबईतून झाला. यात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. केसरी साड्या परिधान करून मुंबईतीलहजारो स्त्रिया चौपाटीवर जात होत्या, त्यांना मेऱ्या सोजीऱ्यानी अडविले आणि निशस्त्र स्त्रियांवर गोळीबार केला. काही स्त्रिया जागीच ठार झाल्या. पण त्यांनी आंदोलन थांबविले नाही. चिमूर गावात अशाच काही महिलांवर आणि शाळकरी मुलींवर लष्करी जवानांनी अत्याचार केले. याची न्यायालयीन चौकशी करणारी मागणी स्त्रियांकडून पुढे आली. डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनात अनेक दलित स्त्रियां होत्या. काळाराम मंदिर प्रवेशाच्या वेळी मंदिर प्रवेशाच्या आड येणाऱ्या पुजाऱ्याला त्यांनी चांगलाच चोप दिला होता. भगतसिंह-राजगुरू-सुखदेव या क्रांतिकारकांच्या चळवळीत वआजाद हिंद सेनेत काही स्त्रिया होत्या. या स्त्रिया महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीत मोलाचे योगदान दिले आहेत.

**स्वातंत्र्यलढ्यातील दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रियांची भूमिका :**

भारतीय स्वातंत्र्यचळवळीत इंग्रज राज्यकर्त्यांनी वेगवेळ्या आरोपाखाली महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांना तुरुंगात टाकले. त्यामुळे ब्रिटीशांच्या विरोधातस्वातंत्र्य सैनिकांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात स्वातंत्र्य चळवळ भक्कम करण्यास सुरु केले. पुढे या चळवळीला लोक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. याचे पडसाद दक्षिण महाराष्ट्रात ठीक ठिकाणी उमटले. सोलापूर, कोल्हापूर, पूर्वीचा साताराआणि आत्ताच्या सांगली जिल्ह्यातप्रथम मोर्चे व नंतर भूमिगत चळवळ यास्वरुपात क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य चळवळ अव्याहतपणे सुरु ठेवले.स्वातंत्र्याच्या चळवळीत वेगवेगळ्या माध्यमातून तुरुंगात गेलेल्या कार्यकर्त्यांच्या मुला-बाळाला आधार देणे, त्यांचे संसार चालविणे, क्रांतीकारकांना आपल्या घरात आश्रय देणे, निराधार लोकांना अन्न-पाणी पुरवणे, संग्रामात आवश्यक असलेली शास्त्रांची ने-आण करणे, कैदेत असताना साक्षरता वर्ग घेणे, बंदुका चालवणे इत्यादी हजारो प्रकारची कामे स्त्रियांनीकेली. यासर्व प्रकारच्या उपरोक्त सहकार्याने पुरुषांना पाठिंबादेवून स्वातंत्र्य चळवळीस मदत करण्याचे काम याग्रामीण भागातील स्त्रियांनी केला.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सातारा जिल्ह्यातील क्रांतीकारकांनी केलेले कार्य हे भारताच्या इतिहासात एक सुवर्ण पान आहे. कारण भारतातील ब्रिटीश सत्तेविरूद्ध जी प्रतिसरकारे स्थापन झाली, त्या सरकारांचा लगेचच बीमोड झाला. परंतु, सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकार स्वातंत्र्य मिळेपर्यंत कार्य रूपाने टिकून होते. जसे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी अनेक क्रांतीकारकांना साथ दिली, तसेच प्रतिसरकार चळवळीत स्त्रियांनीही आपल्या ताकदीनुसार क्रांतीकारकांना साथ दिली. ''प्रतिसरकार चळवळीमध्ये राजुताई बिरनाळे, इंदुताई पाटणकर यांच्याप्रमाणे लक्ष्मीबाई नायकवडी, हौसाबाई पाटील, इंदुताई पाटील, गंगुबाई लाड, विजयाताई लाड, लिलाताई पाटील, जनाबाई, गुणाबाई, भामिर्थी गुरव अशी अनेक नावे घेता येतील.१९४३ ते १९४६ कालखंडात खानापूर, तासगांव, वाळवा, सांगली, आष्टा, बुधगाव मिरज हा सातारा जिल्ह्यातील भाग प्रतिसरकारच्या चळवळीने गाजला. खरे तर ही चळवळ ब्रिटीश सरकारच्या विरूध्द गनिमीकावाच होता.

सातारा जिल्ह्यातील भूमिगत कार्यकर्त्यांची बैठक ३ जून, १९४३ रोजी वाळवे तालुक्यातील कामेरी या गांवी घेण्यात आली. आणिब्रिटीश सत्तेविरूध्द प्रतिसरकारची स्थापना झाली. प्रतिसरकारच्या स्थापनेपूर्वीपासून राजूताई पाटील ऐतवडे बु।।. यासारख्या स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत काम करीत होत्या. प्रतिसरकारच्या मार्गदर्शनाखाली भूमिगतांनी १९४२ ची चळवळ चालू ठेवली होती. या कामात नागनाथ आण्णांनी जी कामगिरी बजावली होती. त्याच नागनाथ आण्णांच्या आई क्रांतिमाता लक्ष्मीबाईंनी मोलाचे सहकार्य केले होते. ग्रामीण भागात प्रतिसरकारचे कार्य सुरू होते. प्रत्येक गावात, खेडयात क्रांतीकारकांबरोबरस्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग होता. राजमती पाटील, लीला पाटील-कुंडल गट यांनी ग्रामीण भागात जाऊन मुक्ताबाई साठे, लक्ष्मीबाई पाटील, इंदुमती पाटील, सुभद्राबाई सावंत, इंदिराबाई देशपांडे इ. स्त्रियांच्या सहाय्याने प्रति सरकारमधील सहभाग वाढविला. रामानंद भारती यांच्या नेतृत्वाखलीदेखील या स्त्रियांनी कार्य केले.क्रांतिवीरांगना लक्ष्मीबाई नायकवडी यांनी क्रांतिवीर नागनाथ आण्णा यांना प्रतिसरकारच्या प्रत्येक कार्यात नेहमीच साथ व संस्कार दिले. म्हणूनच प्रतिसरकाचा हा छावा क्रांतिवीर नागनाथ आण्णाचे कार्य सिध्दीस गेले.

इंदुमती पाटणकर या महाराष्ट्रातील कासेगाव येथील ग्रामीण भागात राहणार्या स्वातंत्र्यसैनिक आणि दीर्घकाळ ज्येष्ठ कार्यकर्त्या होत्या. इंदुताईंचे वडील दिनकरराव निकम १९३० पासून स्वातंत्र्य चळवळीत होते आणि सत्याग्रहासाठी तुरुंगात असताना ते कम्युनिस्ट झाले आणि भाई व्ही.डी. सारख्या कम्युनिस्ट नेत्यांना



Peth Vadgaon Dist.Kolhapur

ISSN No. 2394-5990

गेले. इंदुताईंनी गावातील काँग्रेसच्या मिरवणुकांमध्ये भाग घेतला. पुढे ती राष्ट्रसेवा दलात जाऊ लागली. १९४२ मध्ये, इंदुताईंनी वयाच्या १६ व्या वर्षी आपले आई-वडिलांचे घर सोडले आणि १९४२ च्या ब्रिटिश राजवटीविरुद्धच्या स्वातंत्र्य चळवळीत सामील झाल्या. महिलांना संघटित केले आणि राष्ट्र सेवा दलाचा प्रचार व प्रसार केला. तिने हळूहळू १९४३ पर्यंत प्रतिसरकारच्या भूमिगत चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली आणि लढवय्यांकडे शस्त्रे नेली. त्यांनी आपले घर सोडले, गावोगावी जाऊन पूर्ण टाइमर म्हणून काम केले. बंदुका किंवा इतर शस्त्रे घेऊन, गरज पडल्यास पोलिसांचा सामना करण्यामध्ये इंदूताईंची भूमिका महत्वाची होती.

लिलाबाई माळवदे यांचा जन्म ३०जुलै १९२० ला मिरजेच्या विनायक आणि आंबुताई पिसे यांच्या पोटी झाला. लहान वयातच वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह १९३३ मध्ये कोल्हापूर संस्थानातील रेंदाळच्या पितांबर माळवदेशी झाला. त्यांच्या घरी आचार्य भागवत, बाबासो खंजिरे, भाई माधवराव बागल अशा चळवळीतील नेत्याचे येणे जाणे असे. पितांबर माळवदे ही शालेय जीवनापासून गांधी चळवळीकडे आकृष्ट झाले होते. या राजकीय वातावरणाचा परिणाम सौ. लिलाबाई यांच्यावरही झाला.१९३९ मध्ये कोल्हापूर संस्थानात प्रजा परिषद चळवळ सुरु झाली. पितांबर माळवदे या चळवळीशी जोडले गेले. पोलिसांनी कोल्हापूर संस्थान प्रजा परिषद बेकायदाठरवून संबंधित कार्यकर्त्यांची धरपकड केली. त्यावेळी एप्रिल १९३९ मध्ये पितांबर माळवदेंनाही पकडले. जयसिंगपूर कोर्टात यासंबंधी केस चालली. त्यांना सहा महिने सक्त मजुरी आणि २०० रुपये दंडाची शिक्षा झाली. १९४२ मध्ये चलेजाव आंदोलन वेगाने साऱ्या भारतभर पसरले. इकडे पितांबर माळवदेंचे स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणे सुरु होतेच. पितांबर माळवदेंनी कोल्हापूरला काही सहकाऱ्यासमवेत रेसिडेन्सी बंगल्यावर मोर्चा काढला. बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांची नजर चुकवत तिथे तिरंगा फडकविला. त्यांना परत कैदेत टाकले गेले. पितांबर माळवदेंच्या गुप्त निरोपानुसार लिलाबाईंनी काही स्त्री पुरुषांना मोर्चासाठी तयार केले आणि सहकाऱ्या समवेत कोल्हापुरातील रेसिडेन्सी बंगल्यावर मोर्चा काढला. लिलाबाईबरोबर असलेल्या रामचंद्र गिरीबुवा, दत्तात्रय विभुते, लक्ष्मण कदम यांना पोलिसांनी लॉरीत चढविले. लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशनमध्ये आणून चौकशी करून आणि समज देऊन त्यांना सोडण्यात आले.

१० ऑक्टोबर १९४२ रोजीकोल्हापुरात शिवाजी पुतळ्याच्या जागी त्यावेळी माजी गव्हर्नर लेस्ली विल्सन याचा पुतळा होता. या पुतळ्यावर आंदोलकस्त्रियांनी ॲसिडमिश्रित डांबर फेकून विद्रुप केला. यामध्ये भागीरथीबाई तांबट, जयाबाई हावीरे यांच्याबरोबर लिलाबाई माळवदे सहभागी झाल्या होत्या. याप्रकरणी लिलाबाईना सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली.त्यांची मुले लहान असल्याने कोर्टाची माफी मागून सोडण्याचा प्रस्ताव या महिलांपुढे ठेवला मात्र या स्वाभीमानी व स्वातंत्र्याच्या प्रेरणेने प्रेरित विचारामुळे त्यांनी कारावासात जाणे मान्य केले. १९४३ मध्ये लिलाबाई माळवदेनी कोल्हापुरात पुन्हा एकदा पिकेटिंग केले. यावेळी पोलिसांनी त्यांना अटक करून कोल्हापूरच्या सेंट्रल जेलमध्ये ठेवले. लिलाबाईना तीन महिने सक्तमजुरी व ५० रुपये दंड ठोठावला गेला.

ब्रिटिश सत्तेला त्यांनी विरोध केलाच शिवाय समाजातल्या अपप्रवृतीनाही त्यांनी विरोध केला. रेंदाळ गावात दरवर्षी चैत्र शुद्ध नवमीला शेरअली यांचा मोठा उरूस भरत असे. या उरूसात मोठ्या प्रमाणावर दारूची विक्री होत असे हे थांबविण्याचा प्रयत्न लिलाबाईनी केला. दारू विक्रीच्या दुकानावर मोर्चा काढून दारू विक्री न करण्याचे आवाहन त्यांनी केले. या कृत्याने पोलिसांनी त्यांना हातकणंगले कोर्टासमोर उभा केले. मात्र कोर्टाने त्यांना निर्दोष सोडले.स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत लिलाबाईंचे हे कार्य सुरु राहिले. स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदानाबद्दल महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याकडून त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले तर स्वातंत्र्य दिनाच्या रौप्यमहोत्सवाच्या वेळी राज्याचे माजी गृह राज्यमंत्री रत्नाप्पा कुंभार यांच्या हस्ते ताम्रपट देण्यात आला. पुढे त्या स्थानिक राजकारणात व समाजकारणात सक्रिय राहिल्या. अशा कर्तुत्ववान स्त्रीचे २४ जुलै १९९१ मध्ये निधन झाले.

भारतभर कोटयावधी देशबांधव स्वातंत्र्यलढयात उतरले. लाठीमार, गोळीबार, अटकसत्रांच्या बातम्या देशभर पसरल्या. सोलापूर यास अपवाद नव्हते. सोलापूरचे कस्तुरबाई दोशी यांच्याबरोबर राजमती पाटील, सुमतीबाई शहा याक्रांतिकार्यात सक्रिय बनल्या होत्या.सोलापूर शहरातील गंगुबाई किनरे यांना १९४२ च्या चले जाव आंदोलनात सहभागी झाल्याबद्दल अटक करून १०० रु. दंड आणि एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा थोठवण्यात आली. अखेर त्यांचा जेलमध्ये मृत्यू झाला. शहरातील स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या स्त्रियांपैकी हौतात्म्य पत्करणार्या गंगूबाई किनरे ह्या सोलापूर जिल्ह्यातील 'पहिल्या स्त्री हुतातम्या' होत.

**समारोप :**

उपरोक्त विवेचनावरून भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रियाचे योगदान अधोरेखित होते. ज्या काळात ब्रिटीश सरकारच्या विरोधातील वातावरणात स्त्रियांनी आवाज उठवणे, आंदोलन करणे, लिहिणे, सरकार विरोधी



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist.Kolhapur

णा देणे, क्रांतीकारकांना मदत करणे खरेच धाडसाचे होते, हासिक होते. त्यांची ब्रिटीश सत्तेच्या विरोधी कृती पारतंत्र्य जेची होती असे म्हणता येईल..

र्भ सूची :


- माने रणजीत, (संपा)., भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचे योगदान, प्रकाशक – डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव, २०१८
- नदाफ हाजी, मुंबई इलाख्यातील स्त्रीमुक्ती व स्त्री अस्मितेचा अविष्कार : एकोणिसावे शतक, माने रणजीत, (संपा)., भारतीय स्वातंत्र्य लढ्यातीलत स्त्रियांचे योगदान, प्रकाशक-डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव, २०१८
- पाटील पद्मजा, इंदूमती नाईक: तेजस्वी स्वातंत्र्यसैनिक, मालती प्रकाशन, माणगांव,२००९, पृ. ६२-७२.
- पाटील पद्मजा, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारी महिला राजमती पाटील, महावीर जयंती स्मरणिका, छिंद्वाडा, मध्यप्रदेश, १९९५, पृ. १९
- तांबट प्रभाकर, 'क्रांतीच्या ज्वाळे', मधुश्री प्रकाशन, पुणे, २०१०
- पाटील अवनीश, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान समजून घेताना, माने रणजीत, (संपा)., भारतीय स्वातंत्र्य लढ्यातीलत स्त्रियांचे योगदान, प्रकाशक – डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव, २०१८
- Mane Ranjit,(Ed) Contribution of Women in India's Struggle for Freedom, Principal, Dr.Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, PethVadgaon, 2018
- कुंटे ग.ग., स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृतिक मंडळ, मुंबई
- https://en.bharatpedia.org.in/wiki/IndumatiBabuji-Patankar
- http://www.posterwomen.org/Posterwomen/?p=5743
- News, Maharashtra (15 July 2017). Indumati Patankar, freedom fighter dies at 91. Maharashtra Today. Retrieved 14 December 2019.
- https://www.lokmat.com/sangli/great-contribution-women-sangli-district-freedom-movement-a697/
- KholeSupriya, NadafHaji (Ed),Local History and Cultural Identity in India, Dnyanjyo Publication, Kolhapur, 2019


■■■



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist.Kolhapur

# भारतीय इतिहासलेखन आणि सबाल्टर्न इतिहासलेखन परंपरा

१) डॉ. मल्लिकार्जुन बंदारे

२) डॉ. हाजी नदाफ
Hdnadaf80@gmail.com
मोबाईल क्र. ९७६७९५२१३२

**प्रस्तावना :**

भारतीय इतिहासातील दुर्लक्षित गटाला केंद्रस्थानी आणून इतिहासाची पुनर्मांडणी करण्याचे काम वंचित इतिहासानी केली. भारतात वंचितांच्या कर्तुत्वाला केंद्रस्थानी ठेवून वंचित इतिहासकारांनी 'सबाल्टर्न हिस्ट्रीचा' प्रकल्प राबविला. या प्रकल्प अभ्यासातून निरनिराळ्या भागातील आदिवासी, स्त्रिया, शेतकरी, कामगारांचे योगदान नोंदविले गेले. यातूनच सामन्यांच्या व बहुजन्यांचा अस्मितांचा शोध घेतला गेला. यामुळे इतिहास अभ्यासाची ही नवी शाखा आता स्थिररूप झाली आहे. ह्रसबाल्टर्नफ हा शब्द लॅटिनमध्ये सब (खाली, खाली) आणि अल्टर (अन्य) किंवा अल्टरनस (पर्यायी) पासून बनला आला आहे. ज्यामुळे सबाल्टर्नसची (गौण) निर्मिती झाली. भारतात 'सबाल्टर्न' इतिहासलेखन भारतात १९८० नंतर प्रचलित झाला. खऱ्या अर्थाने 'सबाल्टर्न' इतिहासलेखनाचा दृष्टीकोण इंग्लंडमध्ये उदयास आलेल्या 'हिस्ट्री फ्रॉम बिलो' म्हणून प्रसिद्ध असलेल्या लेखनप्रवाहाशी काही अंशी जुळणारा आहे. 'सबाल्टर्न' विचारप्रवाहाचा उदय वस्तुतः दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या व्यापक इतिहासाच्या संदर्भात झाला. भारतीय समाजाच्या तळागाळातील जनसमूहांच्या कार्याची माहिती करून घेतल्याखेरीज तत्कालीन इतिहासाचे दर्शन होणार नाही या धारणेतून असे संशोधन व लिखाण करण्याच्या हेतूने डॉ.रणजीत गुहा यांनी 'सेंटर ऑफ साउथ एशियन कल्चरल स्टडीज' या संस्थेची पायाभरणी केली. भारतातील आधुनिक काळातील वंचित इतिहासावर लेखन करण्यासाठी काही इतिहासकार एकत्र येऊन सामूहिकरीत्या जाणीवपूर्वक इतिहासक्षेत्रात नव्या प्रयोगाचे पर्व सुरु केले. समविचारी अभ्यासकांनी एकत्र येऊन असा सामूहिक उपक्रम सुरु करण्याचा इतिहास क्षेत्रांतील हा अभिनव प्रयोग होय. 'सबाल्टर्न स्टडीज' च्या पहिला अंक हा नव्या विचारप्रणालीचा मूर्त अविष्कार होता. हा उपक्रम पुढे चालू राहिला व त्याचा एक प्रवाह बनला. गुहा यांनी पुरस्कृत केलेल्या सबाल्टर्न प्रवाहाचा तात्विक आधार अन्तोनिओ ग्रामची ह्या इटालियन मार्क्सवादी विचारवंताच्या लिखाणात आढळून येतो. 'हेजिमनी' ह्या संकल्पनेचे विवेचन करताना ग्रामची सबाल्टर्न ही संज्ञा वापरला. ग्रामचीचा हा विचार गुहा यांनी स्वीकारला आणि तो इतिहासाच्या अध्ययनाला लागू केला. समाजातील वंचित समूहाचा आणि गटांचा इतिहास अभ्यास किंवा नव्या प्रवाहाला सबाल्टर्न असे नामकरण केले गेले.

**सबाल्टर्न व मार्क्सवादी विचार :**

भारतात विसाव्या शतकात मार्क्सवाद, राष्ट्रवाद, उत्तर-वसाहतवादी सिद्धांत आणि स्त्रीवाद यांच्या प्रभावाखाली, सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक पदानुक्रमांमध्ये अधीनतेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सबाल्टर्नचा व्यापकपणे वापर केला जाऊ लागला. या स्तरीकरणामुळे विस्थापित झालेल्या उपेक्षित किंवा सबाल्टर्न सहभागींच्या भूमिका पुनर्प्राप्त करण्यासाठी समाज, इतिहास आणि इतर मानवी परिस्थितींचे विविध पैलू राष्ट्रीय, सांप्रदायिक आणि वैयक्तिक स्तरावर तपासले जावू लागले. भारतीय सबाल्टर्न स्टडीज ग्रुपच्या अभ्यासकांनी त्यांच्या ऐतिहासिक हस्तक्षेपांमध्ये राष्ट्रवादाच्या संक्रमणाच्या मार्क्सवादी विश्लेषणासंबंधी समीक्षेचा समावेश केला. मार्क्सवादाच्या समीक्षेने आधुनिकता आणि प्रगतीची राष्ट्र-राज्याची विचारधारा यासंदर्भात उत्पादन-पद्धती वरील मार्क्सवादी अवलंबित्वाला लक्ष्य केले. सबाल्टर्न हा शब्द सूचित करतो की, मार्क्स आणि मार्क्सवादी विचारांशी या गटाचा संबंध देखील मार्क्सच्या औपनिवेशिक शोषणातून जात असलेल्या समाजांमधील राजकीय परिवर्तनांच्या ऐतिहासिक आणि सैद्धांतिक समजांशी होता.

**सबाल्टर्नची वैचारिक बैठक :**

सबाल्टर्न इतिहासलेखनामागील वैचारिक बैठक गुहा यांनी सबाल्टर्न स्टडीजच्या पहिल्या अंकातील प्रस्तावनेत विशद केली आहे. त्यांच्या भूमिकेचे पैलू नकारात्मक आणि सकारात्मक आहेत. नकारात्मक पैलू म्हणजे आजवरच्या इतिहासलेखनाची

ISSN No. 2394-5990

भूमिका व दृष्टीकोण ते नाकारतात आणि त्यानंतर इतिहास लेखनाबाबतचा आपला दृष्टीकोण मांडतात, हा त्यांच्या वैचारिकतेचा सकारात्मक भाग होय. आजवरच्या इतिहास लिखनासंबंधी त्यांनी आक्षेप घेततात ते असे कि, आजवर लिहिला गेलेला आधुनिक भारताचा इतिहास अभिजन वर्गाने लिहिलेला असून तो त्या वर्गाच्या वैचारिक भूमिकेतून लिहिला गेला आहे. तसाच तो अभिजन वर्गासाठीच लिहिला गेला आहे. त्यामुळे त्यांचे लिखाण अभिजन केंद्रित झाले आहे. त्याचबरोबर काही इतिहासकारांनी जनसमुहांचा, गटांचा, शेतकरी, कामगार, महिला इत्यादी गटांच्या सहभागाचा निर्देश लिखाणात केला असला तरी त्यांचे स्थान, विचारशक्ती, अंत:प्रेरणा यांचा अनाकलनीय सूचित केले आहे. हे इतिहासदर्शन वास्तव नसल्याने ही भूमिका अनैतिहासिक आहे.

**सबाल्टर्न इतिहासलेखनाची टप्पे :**

भारतातील सबाल्टर्न स्टडीजचा ऐतिहासिक विकास हा दोन टप्यात पाहता येईल. १) पहिल्या टप्प्यात रणजित गुहा, शाहिद अमीन, ज्ञानेंद्र पांडे, स्टीफन हेनिंगहॅम, डेव्हिड हार्डीमन, सुमित सरकार इत्यादींनी वंचित इतिहासलेखन केले. हे लेखन हेजीमनिक उच्चभ्रू आणि दडपलेले सबाल्टर्न यांच्यातील संघर्षावर होते. या टप्प्यात, लेखन खालच्या, शोषित वर्गाच्या चिंतेवर आणि उच्चभ्रू किंवा शोषित वर्गावर टीका करण्यावर केंद्रित होते. विद्वानांच्या लिखाणातून स्पष्ट झाल्याप्रमाणे या टप्प्यावर ग्रामचियन विचारांचा प्रभाव प्रचंड होता. २) दुसऱ्या टप्प्यात पार्थ चॅटर्जी, गौतम भद्र, ज्ञान प्रकाश, दीपेश चक्रवर्ती, इतरांचे लेखन महत्वाचे मानले जाते. या टप्प्यात उत्तर आधुनिकतावादी आणि उत्तर-वसाहतवादी विचारसरणीचा प्रभाव सबअल्टर्न विद्वतेचा मुख्य आधार बनला. सबाल्टर्न स्टडीज प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील भारतीय इतिहासाच्या 'सबाल्टर्न' लेखनात मिशेल फुकॉल्ट आणि जॅक डेरिडा यांच्या उत्तर-वसाहतवादी लेखनाचा प्रभाव प्रचंड होता. सबाल्टर्न इतिहासलेखनाच्या या प्रवाहामध्ये लक्षणीय बदल झाले, ज्यामध्ये वर्गाकडून समुदायाकडे, भौतिक विश्लेषणापासून ते संस्कृती पर्यंत लक्ष केंद्रित केले गेले.

**भारतीय सबाल्टर्न इतिहासकार :**

रणजित गुहा, पार्थ चॅटर्जी, ज्ञानेंद्र पांडे, डेव्हिड अरनॉल्ड, डेव्हिड हार्डीमन, शाहिद अमीन, दीपेश चक्रवर्ती, गौतम भद्रा, ज्ञान प्रकाश, सुझी थारू, प्रदीप जेगनाथन, शैल मायाराम, एम.एस.एस. पांडियन, अजय स्कारिया, डेव्हिड अर्नाल्ड, सुदिप्त कविराज, सरोजिनी साहू, गायत्री चक्रवर्ती स्पिवाक, एरिक स्टोक्स, इंजिन सुस्तम आणि उमेश बागडे आदि भारतीय सबाल्टर्न इतिहासकारांनी सबाल्टर्न विचारप्रवाहातून विपूल लेखन केले आहे. भारतामध्ये 'सबाल्टर्न' इतिहासलेखन हे आधुनिक दक्षिण आशियातील इतिहासकारांच्या एका गटाच्या लेखनातून तयार झाले आहे. 'सबाल्टर्न' ग्रुपने प्रथम सबाल्टर्न इतिहासलेखन १९८२ मध्ये 'सबाल्टर्न स्टडीज' नावाच्या मालिकेत प्रकाशित केले. सबाल्टर्न स्टडीजने स्वतःला भारतीय इतिहासाच्या विशेष संदर्भात इतिहास-लेखनाचे एक मूलगामी स्वरूप म्हणून प्रतिपादन केले. भारतातील संशोधन आणि शैक्षणिक कार्याचा मुख्य आधार असलेल्या अभिजात पूर्वाग्रहाला दुरुस्त करणे हा या नवीन ऐतिहासिक लेखनाचा उद्देश होता. अनादी काळापासून उच्चभ्रू लोकांनी सबाल्टर्नवर वर्चस्व गाजवल्याने या सुधारणावादी कृतीने वंचित इतिहासलेखनाची सुरुवात केली. 'सबाल्टर्न स्टडीज' मालिकेत लेखन करून पुढील इतिहासकारांनी आपले योगदान दिले. रणजित गुहा, सबाल्टर्न स्टडीज I-VI (दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९८२-९), पार्थ चॅटर्जी आणि ज्ञानेंद्र पांडे, सबाल्टर्न स्टडीज VII (दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९९२), पार्थचॅटर्जी आणि प्रदीप जेगनाथन, सबाल्टर्न स्टडीज इलेव्हन (दिल्ली: पर्मनंट ब्लॅक, २०००), डेव्हिड अर्नोल्ड आणि डेव्हिड हार्डीमन, सबाल्टर्न स्टडीज VIII (दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९९२), शाहिद अमीन आणि दिपेश चक्रवर्ती, सबाल्टर्न स्टडीज IX (दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९९६), गौतम भद्र, ज्ञान प्रकाश, आणि सुसी थारू, सबाल्टर्न स्टडीज द (दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९९९), शैल मयाराम, M.S.S. पांडियन, आणि अजय स्कारिया, सबाल्टर्नस्टु-डायज XII (दिल्ली: परमनंट ब्लॅक, २००५) आदि.

**भारतीय सबाल्टर्न इतिहासलेखन :**

भारतीय इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील सबाल्टर्न लेखन प्रवाहाचे प्रणेते म्हणून डॉ. रणजीत गुहा यांचे नाव सुप्रसिद्ध आहे. रणजित गुहा यांनी सबाल्टर्न स्टडीजच्या पहिल्या खंडात असे घोषित केले की, भारतीय राष्ट्रवादाच्या इतिहासलेखनात अनेक काळापासून अभिजातवाद- वसाहतवादी अभिजातता आणि बुर्जुआ राष्ट्रवादी अभिजातता यांचे वर्चस्व राहिले आहे. गुहा यांच्या मते मलोकांचे राजकारण हे उच्चभ्रूंच्या राजकारणापेक्षा वेगळे होते. प्रथम, त्याची मुळे लोकांच्या पारंपारिक संघटनेत आहेत जसे की, जात आणि नातेसंबंध, आदिवासी एकता, प्रादेशिकता इत्यादी. दुसरे, तर उच्चभ्रूंचे एकत्रीकरण उभ्या स्वरूपाचे होते. तिसरे, उच्चभ्रू जमाव कायदेशीर आणि शांतप्रीय होते, पण सबअल्टर्न एकत्रीकरण तुलनेने



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist.Kolhapur

हिंसक होते. चौथे, उच्चभ्रू जमाव अधिक सावध आणि नियंत्रित होते, तर सबअल्टर्न एकत्रीकरण अधिक उत्स्फूर्त होते. गुहा यांच्यासाठी 'सबाल्टर्न' म्हणजे मते स्पष्टपणे निश्चित अस्तित्व आहे, जे एकूण भारतीय लोकसंख्या आणि ज्यांचे आम्ही उच्चभ्रू म्हणून वर्णन केले त्यांना सोडून असलेला वर्ग. गुहा यांनी असे प्रतिपादन केले की, सबाल्टर्ननी इतिहासात स्वतःहून म्हणजे उच्चभ्रूंपासून स्वतंत्रपणे काम केले होते आणि त्यांचे राजकारण एक स्वायत्त क्षेत्र बनले होते. कारण उच्चभ्रू राजकारणातून वंचितांचे अस्तित्व उद्भवलेले नाही किंवा त्याचे अस्तित्व नंतरच्या राजकारणावर अवलंबून राहिले नाही.

डेव्हिड हार्डीमन यांनी 'पश्चिम भारतातील कृषी समाजाच्या वर्गीय विश्लेषणावर' लक्ष केंद्रित केले, ज्यामुळे राष्ट्रवादी चळवळीतील शेतकऱ्यांचा उदय आणि सहभाग स्पष्ट करण्यात मदत झाली. गुजरातमधील खेडा जिल्ह्याच्या त्यांच्या तपशीलवार स्थानिक अभ्यासामुळे मध्यम शेतकरी हा कृषी राष्ट्रवादाचा अग्रेसर होता हे स्पष्ट झाले. त्यांच्या मते या गटाने गुजरातमध्ये सबअल्टर्न वर्ग तयार केला. हार्डिमन यांनी स्पष्ट केले की गरीब शेतकरी, श्रीमंत शेतकरी किंवा जमीनदार उच्चभ्रू लोकांपेक्षा मध्यम शेतकरी हे ग्रामीण समाजातील राजकीयदृष्ट्या सर्वात कट्टरपंथी वर्ग होते. त्यांच्या मते मध्यम शेतकरी स्वायत्तपणे काम करत होते आणि इतरांवर प्रभाव टाकून राष्ट्रवादी चळवळीला पाठिंबा मिळवत होते.

डॉ. शाहीद आमीन हे डॉ. रणजीत गुहांचे निकटचे सहकारी म्हणून ओळखले जातात. काही काळ यांनी सबाल्टर्न स्टडीजचे संपादक म्हणून काम पाहिले. आमीन हे दिल्ली विद्यापीठातील इतिहास विषयाचे अध्यापक होते. शाहिद अमीन यांनी Making the Nation Habitable या लेखात असे मत मांडले की, १९२१-२२ मध्ये शेतकरी राजकारणाच्या हजारो वर्षांच्या आणि खोल विध्वंसक भाषेचा सामना करणारे भारतीय राष्ट्रवादी शेतकऱ्यांच्या बंडाना स्वतःचे आणि गांधीवादी असल्याचा दावा करण्यास तत्पर होते. शेतकर्यांना गांधींचा बंडखोर विनियोग मान्य करता न आल्याने, भारतीय राष्ट्रवादींनी रूढीवादी संबंधात त्याचे प्रतिनिधित्व केले. १९२२ मधील शेतकरी हिंसाचारामध्ये अनेक पोलिसांचा मृत्यू झाला आणि गांधींनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध असहकार आंदोलन स्थगित केले. भारतीय राष्ट्रवादी इतिहासातील या वादग्रस्त तारखेकडे परत येताना अमीन यांनी असा युक्तिवाद केला की, ही हिंसक घटना वसाहतवादी न्यायिक प्रवचनात 'गुन्हेगार' ठरली ती उच्चभ्रू राष्ट्रवाद्यांनी 'राष्ट्रीयकृत' केली. एकीकडे ते शेतकरी हिंसेला राष्ट्रवादी म्हणून मान्यता देऊ शकत नव्हते आणि दुसरीकडे त्यांना शेतकरी गुन्हेगार हा राष्ट्राचा एक भाग म्हणून मान्य करावे लागले.

ज्ञानेंद्र पांडे यांनी असा युक्तिवाद केला की, 'अवधमधील शेतकरी चळवळी असहकार चळवळी'च्या आधी आणि स्वतंत्रपणे उभ्या होत्या. आणि स्थानिक सत्तेविषयी शेतकऱ्यांची समज आणि औपनिवेशिक सत्तेशी त्याची युती अधिक होती. जिथे काँग्रेस संघटना मजबूत होती तिथे शेतकऱ्यांची दहशत कमी होती. पांडे सुचवतात की भारतीय राष्ट्र-राज्याचे एक राष्ट्रीय समुदाय म्हणून कल्पना करायची होती, तो समुदाय राजकीय स्वरूप म्हणून ओळखू शकला नाही.

दीपेश चक्रवर्ती यांनी सबाल्टर्न स्टडीज प्रकल्पात मकामगार-वर्गाच्या इतिहासाचा पुनर्विचारफ या दिशेने सर्वात व्यापक योगदान दिले. संस्कृतीचे विशिष्ट तर्क हे केवळ राजकीय अर्थव्यवस्थेद्वारे स्पष्ट केले जाऊ शकत नाही. त्यांच्या मते, 'संस्कृती ही भारतीय मार्क्सवादाचा अविचार आहे'. चक्रवर्तींसाठी, सांस्कृतिक विश्लेषणाकडे वळणे हे भारतीय उदारमतवादी आणि मार्क्सवादी इतिहासलेखनाचा 'अर्थवाद' म्हणून ओळखल्या जाणार्या मूलभूत गोष्टीपासून दूर जाणे होय. बंगालच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीतील कामगार वर्गाबद्दल लिहिण्याच्या समस्या आणि मोठ्या वसाहती संदर्भाची त्यांनी पुर्नरचना केली. यांच्या मते, भांडवलशाही सत्तेच्या अंतर्गत सामाजिक संबंध टिकून राहिल्याने बंगालमध्ये कामगार-वर्गीय संस्कृतीच्या उदयासाठी विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली होती. सबाल्टर्न स्टडीज प्रकल्पाच्या जातीय अंधत्वाबद्दल उमेश बगाडे यांची टीका भारतीय इतिहासातील राष्ट्रवादी आणि मार्क्सवादी प्रवाहावर टीका म्हणून उदयास आली आहे. वर्गाशिवाय व्यापक मार्क्सवादी फ्रेमवर्क टिकवून ठेवण्यासाठी सबाल्टर्न इतिहासकारांनी अँटोनियो ग्राम्सचीची सबाल्टर्न संकल्पना कशी उधार घेतली हे दाखवून दिले. परंतु दडपशाही आणि आर्थिक शोषणावर ग्रामचीने महत्त्वाचा भर टाकून दिला. जेव्हा त्यांनी सबाल्टर्नचे त्यांचे मॉडेल गौण किंवा स्वायत्त म्हणून तयार केले, तेव्हा ते जात चुकीच्या पद्धतीने वाचतात. जातिव्यवस्थेने पितृसत्तेशी जवळचा संबंध असलेली श्रेणीबद्ध असमानता म्हणून कार्य केले. ज्यामध्ये खालच्या जातींवर स्वायत्ततेऐवजी अत्याचार, शोषण आणि अधीनस्थ केले गेले. अशा प्रकारे एकसंध सबाल्टर्न स्थितीमुळे अत्याचारित कनिष्ठ-जातीतील शेतकरी, आदिवासी शेतकरी, उच्च-वर्णीय वर्ग शेतकऱ्यांसह दूर राहिला. पण खालच्या जाती आणि स्त्रियांच्या बळजबरीने सबाल्टर्न विद्रोहाचा पाया वाढवणारी एकता प्राप्त झाली हे मान्य केले नाही.

### सबाल्टर्न इतिहास लेखनावरील आक्षेप :

सबाल्टर्न अभ्यासाने स्वीकारलेल्या आणि स्पष्ट केलेल्या ग्रामचिच्या संकल्पना उदा. वर्चस्व, दुय्यमत्व, अधिसत्ता,



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist Kolhapur

ISSN No. 2394-5990

सबाल्टर्न जाणीव आदीबाबत निरनिराळे प्रश्न उभे केले गेले. त्यांची समाधानकारक उत्तरे या अभ्यासामध्ये आढळत नाहीत. स्वायत्तता आणि नेतृत्व यांचा परस्परसंबंध कसा लावणार याविषयी कोणतीच स्पष्ट भूमिका यात नाही. सबाल्टर्न इतिहासकरांनी सामाजिक इतिहासाकडे, राजकीय इतिहासाकडे दुर्लक्ष केले. बऱ्याच वेळा क्रेवळ द्विमानांमधून इतिहास पाहिला गेला. अभिजन/ सबाल्टर्न, वसाहतिक/एत्तदेशीय, युरोपीय/ युरोप बाहेरचे, पहिले जग/तिसरे जग, यांमुळे सामाजिक संरचनामधील अन्य बदलाकडे एकत्रित पाहता आले नाही. आफ्रिका, अमेरिका इत्यादी इतिहासलेखनांनी त्यांच्या संदर्भात सबाल्टर्न प्रकल्प पाहिला त्यामुळे तो मूळ गाभ्यापासून दूर जातो काय, असे वाटले. सांस्कृतिक लिखाणाचे महत्व वाढले. ज्ञान आणि सत्ता यांच्यात संदर्भात संस्कृतीचे विवेचन आले. परंतु त्याचा भौतिक पाया न तपासल्याने हे लेखन एकांगी वाटू लागले. उत्तर मार्क्सवादी, उत्तर वासाहतिक लिखाण म्हणूनही या लिखाणाची ओळख करून दिली गेली. हिंदुत्वाचे राजकारण गतिमान असताना कोणते सांस्कृतिक विषय सबाल्टर्न प्रकल्पाच्या लेखनात यायला हवे होते, याबद्दल सबाल्टर्न अभ्यासक काहीच बोलताना आढळले नाहीत. सांस्कृतिक अभ्यास, पॉप्युलर कल्चरच्या अभ्यासाशीही बर्याचदा जोडला गेला. या सर्वांचा परिणाम म्हणजे सबाल्टर्न जाणीवेबद्दलचे लिखाण, त्यातील स्पष्टता नष्ट झाली. शेतकऱ्यांची जाणीव ही सबाल्टर्न जाणीव असली तरी ते पुरुषसत्ताक आहे, याकडे अभ्यासकांनी दुर्लक्ष केले आहे.

**समारोप :**

सबाल्टर्न स्टडीजची सुरुवात १९८० च्या दशकात विद्यमान इतिहासलेखनाची समीक्षा म्हणून झाली. लोकांच्या आवाजाकडे पुनर्लेखणीतून दुर्लक्ष केल्याचा आरोप त्याच्या सबाल्टर्न आरंभकर्त्यांनी केला होता. या लेखकांनी सबाल्टर्न प्रकल्पामध्ये एक पूर्णपणे नवीन प्रकारचा इतिहास लोकांसमोर आणले. भारतीय अभ्यास क्षेत्रामधील अभ्यासक आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियांचा अंदाज घेत सुरुवातीच्या काळात, हे प्रकल्प काही प्रमाणांत पूर्ण झाल्याचे दिसते. सुरुवातीच्या काळात रणजित गुहाने संपादित केलेल्या खंडात सबाल्टर्न स्टडीजने चेतना आणि कृतींचा शोध घेण्याचा प्रयत्न केले. भारतीय समाजातील दुर्लक्षित गटावर अभ्यास करण्याचे काम या ग्रुपने केल्याचे दिसते. या प्रवाहाच्या वाढत्या प्रभावामुळे पाश्चात्य शैक्षणिक वर्तुळातील महत्त्वाचे उत्तर आधुनिकतावादी आणि उत्तर-वसाहतवादी लेखन झाल्याने नंतरच्या काळात, या प्रवाहाने जागतिक इतिहास लेखकांच्या कार्यांवर वर्चस्व गाजवले. वंचित इतिहासलेखनावर टीका होत असले तरीही या विचारप्रवाहाने सबाल्टर्न इतिहासकारांनी इतिहासलेखन करून विपुल प्रमाणात वंचित घटकास न्याय देणायचा प्रयत्न केला हे दिसून येते. या विचारप्रवाहाने इतिहासकारांनी वंचित इतिहासलेखन केल्याने तळागाळातील विषयास न्याय मिळत राहिला हे मान्य करावे लागेल.

**संदर्भ :**


1. Umesh Bagade, Yashpal Jogdand, Vaishnavi Bagade, Subaltern Studies and the Transition in Indian History Writing, Critical Philosophy of Race (2023) 11 (1): 175-208.
2. Ranajit Guha (1982). "On Some -spects of the Historiography of Colonial India', In Ranajit Guha (ed.), Subaltern Studies, Vol. I, Oxford University Press, New Delhi
3. E. Sreedharan, - Textbook of Historiography, 500 B.C. to -.D. 2000, Orient Blackswan, 2004
4. Sabyasachi Bhattacharya, -pproaches to History: Essays in Indian Historiography, Primus Books, Delhi, 2011
5. चव्हाण प्रविण, सबाल्टर्न इतिहास लेखन मुक्तीगीत ? नव्हे शोकात्मिक, साधना दिवाळी अंक, २००६, पृ. ११७

६. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर , २००७

७. देव प्रभाकर, इतिहासशास्त्र संशोधन, अध्यापन आणि लेखनपरंपरा, ब्रेन टोनिक प्रकाशन गृह, नाशिक, २००७

८. गाठाळ एस.एस., इतिहासलेखनशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. २०११

९. https://www.encyclopedia.com/environment/encyclopedias-almanacs-transcripts-and-maps/subaltern-studies


■■■

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07
एप्रिल २०२४
वीरनिर्वाणसंवत् २५५०
वर्ष ७४वे, पुष्प ८वे
फाल्गुन-चैत्र शके १९४५-१९४६
UGC-CARE Listed
Research Journal
www.sanmatimasik.org
बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति


मूल्य - २५ रु.



## भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव



Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon
Dist Kolhapur



परमपूज्य अन्तर्मना आचार्य १०८ श्री प्रसन्नसागरजी महाराज यांचे उदगाव-कुंजवन येथून श्रवणबेळगोळकडे विहार होत असताना श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे दि. ०९ मार्च २०२४ रोजी शुभागमन झाले.


स्वयंभू मंदिरात भ. आदिनाथ यांचा मोक्षकल्याणक साजरा केला. चतुर्दशी असल्याने त्यांचा उपवास होता. भर दुपारी १२.३० वा. परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांच्या समाधीस्थळी त्यांनी सामायिक पाठ केले. त्याचे हे दृश्य आहे. .....

दुपारच्या विस्तृत प्रतिक्रमानंतर पहाडावरील जिनमंदिरांचे दर्शन केले. सायंकाळी सुमारे दीड तास विविध कथा, भजन, म्हणी, सुविचार यांचा आधार घेत मुलांना मंत्रमुग्ध केले. अत्यंत प्रभावी प्रवचन झाले. त्यांचे मार्मिक उद्बोधन मूलत: ऐकण्यासारखे होते. त्यांच्या संघात त्यांच्यासह पाच मुनिराज, तीन क्षुल्लक व आठ आर्यिका माताजी होत्या. संघपती श्रवण दोशी व सोबत शताधिक श्रावक होते.

प्रामुख्याने मुलांना नैतिक, धार्मिक, आध्यात्मिक, भारतीय संस्कृती, सदाचार, शिष्टाचार यासोबत माता-पिता व गुरु यांच्याविषयी विनम्रता बाळगण्यास सांगितले. ते ब्रह्मचारी असताना १९८८ साली बाहुबलीत आले होते तेव्हा गुरुदेवांनी त्यांना एक श्लोक ऐकविला होते. त्याचे ते नित्य स्मरण करीत असतात असा उल्लेख करून आपण ही त्याचे नित्य स्मरण करावे असा उपदेश दिला. तो जिनवाणीचे गौरव सांगणारा श्लोक असा होता.

सरस्वति नमस्तुभ्यं, वरदे कामरूपिणी ।
विद्यारम्भं करिष्यामि, सिद्धिर्भवतु मे सदा ।।

त्यानंतर रविवारी दि. १० मार्च रोजी सकाळी ६.३० वा. भ. पार्श्वनाथांच्या अभिषेकानंतर संघासह त्यांनी विहार केला. एकंदरीत त्याचे येथील वास्तव्य प्रभावी व संस्मरणीय ठरले.



## २१व्या स्मृतिदिनानिमित्त भावपूर्ण संस्मरण...!

सन्मति मासिकाचे संस्थापक-संपादक, १९४० ते १९४६ सोलापूर गुरुकुल व १९४६ ते २००३ बाहुबली गुरुकुल अशाप्रकारे सुमारे ६३ वर्षांहून अधिक काळ गुरुकुलांच्या संचालकपदाची समर्थ धुरा संभाळून धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रास निरपेक्ष सेवाव्रतीने अमूल्य योगदान देणारे बा.ब्र. माणिकचंदजी भीसीकर (गुरुजी) यांचा दि. २० एप्रिल २०२४ रोजी २१वा स्मृतिदिन येत आहे. त्यानिमित्त त्यांच्या नि:स्पृह जीवनकार्यास विनम्र अभिवादन !!!



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon Dist. Kolhapur

सत्प्रेरणा-शुभाशीर्वाद



प.पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन-४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक-संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

## एप्रिल २०२४

❍ वर्ष: ७४ वे ❍ पुष्प १वे

❑ वार्षिक वर्गणी :१५१/-

❑ द्वादशवर्षीय वर्गणी :१५०१/-



❍ संपादक मंडळ ❍

❍ **प्राचार्य श्रीधर हेरवाडे,** एम.ए., बी.एड्.

❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.

❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **श्री. गुलाबचंद बोराळकर,** वेरूळ, शास्त्री, एम.ए. बी.एड्.



**बँक खात्याचे विवरण -**

Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388

* Shri Bahubali Vidyapeeth - A/C No- 638801700001 (80G करपात्र सवलतीकरिता)

* Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G करपात्र सवलतीकरिता)


## ⦿ अनुक्रमणिका ⦿


| | |
|---|---|
| १) मनोनिग्रह : एक मानवीय सद्गुण | ०४ |
| २) पणमामि वड्ढमाणं । | ०५ |
| ३) प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला | ०९ |
| ४) पुण्यनगरी वैशाली | १२ |
| ५) खरा मार्ग | १४ |
| ६) अलौकिक जीवनयात्री : गुरुदेव समंतभद्र | १७ |
| ७) सवार्थसिद्धि में ध्यान का स्वरूप | १९ |
| ८) भारतीय विकासामध्ये जैन समुदायाचे योगदान | २७ |
| ९) पट्टमहादेवी-शब्दांपलिकडील अन्वयार्थ | ३० |
| १०) सन्मति-मासिकातून प्रकाशित कथांमधील स्त्री व्यक्तिरेखा | ३३ |
| ११) हिरनाऽऽ समझ : | ३५ |
| १२) ऋतूचक्र..संकीर्तन | ३६ |
| १३) क्षत्रचूडामणिमें प्रयुक्त नैतिक विचारों की... | ३८ |
| १४) 'अलभ्य लाभ, अलभ्य योग' | ४० |
| १५) विशेष वार्ता-एक सुखद अनुभव | ४३ |




### ✲ महावीरवाणी ✲

प्रत्येक व्यक्तीच्या आचरणातील अहिंसा, विचारातील अनेकांत आणि सामाजिक जीवनातील अपरिग्रह ही अकारत्रयी (अहिंसा, अनेकांत, अपरिग्रह) म्हणजे सद्विचार, सदुच्चार आणि सदाचार हे संपूर्ण जगाचे कल्याण करणारे आहेत.




Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon
Dist Kolhapur

# भारतीय विकास प्रक्रियेमध्ये जैन समुदायाचे योगदान

**श्री. शिवकांत पुपलवाड**
सहा. प्राध्यापक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
पेठ वडगाव. फोन क्र. ९७६३८९८०८६

**डॉ. हर्षवर्धन शंकर यादव**
(SET, NET, JRF, SRF, Ph.D.)
१०२ ब, शिवाजीनगर, पेठ वडगाव,
मोबा. नं. ९९२११११२६५

**प्रस्तावना–**

२०११च्या जनगणनेनुसार भारतामध्ये जैन समाजाची लोकसंख्या ४४,५१,७५३ असून बहुतांश लोक महाराष्ट्र, राज्यस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेश राज्याचे रहिवासी आहेत. भारतामध्ये जैन धर्म हा सहावा सर्वात मोठा धर्म आहे. जैन तत्त्वज्ञानानुसार हे विश्व कोणत्याही देवाने / व्यक्तीने निर्माण केलेले नसून ते वैश्विक कायद्यानुसार कार्य करते. जैन तत्त्वज्ञान कर्म सिद्धांतावर (कारणे आणि परिणाम) भर देतो. भूतकाळ व वर्तमान काळातील कर्माचा पुनर्जन्मादी बाबीवर परिणाम होतो. कर्मबंधन हे मन, शरीर आणि कृती यांच्या उत्कट क्रियांमुळे आहे. राग, अभिमान कपट आणि लोभ या स्वरूपात मानवी वासना असते. ती सम्यग्दर्शन (योग्य विश्वास), सम्यग्ज्ञान (योग्य ज्ञान) आणि सम्यक्चरित्र (योग्य आचरण) या जैन धर्माच्या तीन रत्नांद्वारे प्राप्त करता येऊ शकते.

**सद्यःकाळातील जैन उद्योगाचा विकास**

प्राचीन काळापासून जैन धर्मात मोठ्या प्रमाणात साक्षरतेचे प्रमाण असल्याने आणि विसाव्या शतकात जैनांनी आधुनिक शिक्षण पद्धतीचा पुरेपूर फायदा घेतला असल्याने उद्योजकतेचा मोठ्या प्रमाणात विकास आढळून येतो. जैन उद्योजकांनी व्यापार-वाणिज्य व्यतिरिक्त इतर व्यवसायांमध्येही महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. आजकाल जैन उद्योजक व्यापार, बँक व्यवसाय, आयातदार, निर्यातदार स्वरूपात भारतभर व जागतिक स्तरावर नाव कमवत आहेत. भारतातील मुंबई-बेंगलोर सह अनेक महानगरातील व्यवसायांवर जैन उद्योजकांचे वर्चस्व आढळून येते. सार्वजनिक उपक्रम, न्यायव्यवस्था, औषध निर्मिती, शिक्षण संस्था, इस्पितळे, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र, राजकीय जीवन आणि समाजमाध्यमे व्यवस्थापनामध्ये जैन उद्योजकांनी ठसा उमटवला आहे.

**भारतीय विकास प्रक्रियेमध्ये जैनांचे योगदान**

सर्वात श्रीमंत धार्मिक समुदायापैकी जैन समुदाय हा एक असून याच्या ७०%पेक्षा अधिक लोकसंख्येची नोंद वरिष्ठ वर्गात होते. जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ०.०६% आणि एकूण भारतीय लोकसंख्येपैकी ०.४% जैन समाज असूनही भारतीय अर्थव्यवस्थेत सर्वाधिक योगदान देणारा हा समुदाय आहे. जैन समुदायाचा साक्षरता दर राष्ट्रीय सरासरी ६५.३८ %च्या तुलनेत ९४.०१ %पेक्षा जास्त आहे. महिला साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय सरासरी ५४.१६ % च्या तुलनेत ९०.६ % आहे. १०४ पद्मभूषण पुरस्कार विजेत्यांपैकी ७ पद्मभूषण जैन व्यक्तींना मिळाले आहेत. भारतात जैनांचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक मानले जाते.

* भारताच्या एकूण आयकरापैकी २४% आयकर हा जैन समुदाय भरतो.
* भारताच्या एकूण संपत्तीच्या २८% संपत्ती ही जैन समुदायाची आहे.
* भारताच्या जीडीपी विकासात २५% वाटा जैन समुदायाचा आहे.
* पुढारलेल्या वृत्तपत्रांपैकी बहुतांश वृत्तपत्र हे जैनांची आहेत.
* एकूण सेवाभावी देणगी पैकी ६२% देणगी जैन समाज देतो.
* १६००० गोशाळांपैकी १२००० गोशाळेचे व्यवस्थापन जैन करतात.
* भारतामध्ये पन्नास हजारून अधिक मंदिरे, बहुतांश तीर्थधाम जैनांची आहेत.
* भारतीय भाग बाजारामध्ये ४६% दलाल जैन आहेत.
* खाजगी निर्यातीपैकी २०% निर्यात वाटा,
* एकूण स्थावर मिळकत व बांधकाम उद्योगांमध्ये



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist. Kolhapur

२०% वाटा,

* भारतीय सुवर्ण व अलंकार उद्योगांमध्ये ३३% वाटा,

* भारतीय हिरा व्यापारामध्ये ५०% वाटा जैन समुदायाचा आहे.

* २०% भारतीय औषध कंपन्या जैनांच्या आहेत.

* भारतीय वस्त्र उद्योगांमध्ये २०% वाटा,

* भारतीय हवाई उद्योगांमध्ये ३०% वाटा,

* भारतीय खाजगी ऊर्जा व वित्त उद्योगांमध्ये २०% प्रमाण,

* किरकोळ व घाऊक व्यापारामध्ये १५ ते २०% वाटा,

* भारतीय माध्यम उद्योगांमध्ये २० ते २५ % वाटा जैन समुदायाचा आहे.

**विकास प्रक्रियेच्या विविध क्षेत्रात जैन व्यक्ती–**

**अ.क्र. संस्थापक– महत्त्वाची क्षेत्रे / कंपन्या**

१) दिलीप संघवी– भारतातील सर्वात मोठी औषध कंपनी 'सन फार्मा' चे संस्थापक

२) राजेश मेहता– 'राजेश एक्सपोर्ट' या भारतातील सर्वात मोठ्या सोन्याच्या कंपनीचे संस्थापक

३) पृथ्वीराज कोठारी– RSBL भारतातील सर्वात मोठ्या बुलियन कंपनीचे संस्थापक

४) रसेल मेहता आणि मेहुल चोक्सी–'रोझी ब्लू आणि गीतांजली' भारतातील सर्वात मोठ्या डायमंड कंपनीचे संस्थापक

५) इंदू जैन– BCCI लिमिटेड, (टाइम्स ऑफ इंडिया), भारतातील सर्वात मोठे मीडिया हाऊसचे संस्थापक

६) प्रेमचंद रॉयचंद– बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे संस्थापक भारतातील पहिले स्टॉक एक्स्चेंज

७) मंगल प्रभात लोढा– भारतातील सर्वात मोठ्या रिअल–इस्टेट समूह 'लोढा ग्रुप'चे संस्थापक

८) राकेश गंगवाल– इंडिगो एअरलाइन्सचे संस्थापक, भारतातील सर्वात मोठी विमान कंपनी

९) गौतम अदानी– भारतातील सर्वात मोठी बंदर कंपनी 'अदानी पोर्ट्स अँड सेझ लिमिटेड' चे संस्थापक

१०) भवरलालजी जैन– भारतातील सर्वात मोठ्या सिंचन कंपनी 'जैन इरिगेशन' चे संस्थापक

११) अनुराग जैन आणि तरंग जैन– भारतातील अग्रगण्य ऑटोमोटिव्ह कार आणि मोटारसायकल घटक उत्पादक कंपनी असलेल्या 'व्हॅरोक ग्रुप अँड एन्ड्युरन्स टेक्नॉलॉजीज'चे संस्थापक

१२) गौतम अदानी– 'अदानी पॉवर, अदानी ट्रान्समिशन आणि अदानी ग्रीन'चे संस्थापक, भारतातील सर्वात मोठे खाजगी ऊर्जा समूह

१३) सेठ वालचंद हिराचंद दोशी– भारतातील पहिली जहाज उत्पादक कंपनी 'हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेड'चे संस्थापक

१४) सेठ वालचंद हिराचंद–भारतातील पहिली विमान निर्मिती कंपनी आणि आता भारतातील सर्वात मोठी विमान आणि हेलिकॉप्टर निर्मिती कंपनी 'हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड' चे संस्थापक

१५) डॉ. विक्रम साराभाई– भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) चे संस्थापक

१६) डॉ. विक्रम साराभाई आणि कस्तुरभाई लालभाई– 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' अहमदाबादचे संस्थापक

**भारतीय जैन समुदायामधील काही व्यावसायिक नेते / उच्च अधिकारी**

१. अजित गुलाबचंद – HCC Ltd चे नेते.

२. आनंद जैन – जैन महामंडळाचे मालक, मुंबई.

३. अरुण जैन – इंटलेक्ट डिझाईन अरेनाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक. तसेच पोलारिस कन्सल्टिंग अँड सर्व्हिसेसचे संस्थापक आणि माजी अध्यक्ष व सीईओ.

४. विनय जैन – मित्तनलाल मार्केटिंग लि.

५. विनय मालू – एन्सो ग्रुपचे अध्यक्ष.

६. अंबालाल साराभाई – साराभाई ग्रुप ऑफ कंपनी.

७. कस्तुरभाई लालभाई – अरविंद मिल्सच्या संस्थापकांपैकी एक.

८. मफतराज मुनोत – कल्पतरू लि.

९. नरेंद्र पटनी – पटनी कॉम्प्युटर सिस्टीमचे संस्थापक.

१०. ठक्कर फेरू – अलाउद्दीन खल्जीचे खजिनदार.

११. साहू तोडर – अकबराच्या राजवटीत आग्रा येथील शाही टांकसाळीचा पर्यवेक्षक.

१२. सेठ हुकुमचंद – भारताचा सूती राजा.

**भारताबाहेरील काही व्यावसायिक नेते/ उच्च अधिकारी**

१. अन्सू जैन – ड्यूश बँकेचे माजी सह–सीईओ.

२. अंबिका बंब – बिकांता, यूएसए च्या सीईओ आणि संस्थापक.

३. अजित जैन – बर्कशायर हॅथवे इन्शुरन्स ग्रुप, यूएसए चे अध्यक्ष.

४. नवीन जैन – इन्फोस्पेस आणि इंटेलियसचे



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Peth Vadgaon Dist. Kolhapur

संस्थापक.

**जैनांना समृद्ध बनवणाऱ्या बाबी**

※ शिक्षण : जैन समाजात शिक्षण घेणे अनिवार्य आहे आणि ते त्यांचे कर्तव्य आहे. शिक्षणामुळे नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध होतात आणि ते त्यांचे ज्ञान कोणत्याही प्रकारच्या व्यवसायात गुंतवू शकतात. या सर्व गोष्टी त्यांना श्रीमंत करतात.

※ सामुदायिक समर्थन : आर्थिक संकटाच्या काळात ते त्यांच्या समुदायाच्या संस्था असूनही एकमेकांना मदत करतात.

※ स्वच्छता : जैन परंपरा इतर समुदायांपेक्षा अद्वितीय आहेत आणि ती स्वच्छतेला खूप महत्त्व देते. त्यामुळे, ते निरोगी आणि दीर्घायुष्य जगतात. श्रीमंत होण्यासाठी हा देखील एक महत्त्वपूर्ण घटक आहे.

※ पैसा : जैन लोक पैशाला महत्त्व देतात, पैसे वाचवतात आणि पैसे गुंतवतात ज्यामुळे ते श्रीमंत होतात.

※ निरोगी अन्न : ते त्यांचे रात्रीचे जेवण संध्याकाळी ६ च्या आधी करतात, जे आरोग्यासाठी वैज्ञानिकदृष्ट्या चांगले आहे. ते त्यांच्या आहारात कमी मसालेदार पदार्थ वापरतात, जेणेकरून ते निरोगी राहतील आणि दीर्घकाळ जगतील. चांगले आरोग्य आणि खाण्याच्या सवयी, त्यांना अधिक काम करण्यास आणि श्रीमंत बनण्यास प्रवृत्त करते.

※ व्यवसाय : बहुतेक जैन लोक हुशारीने व्यवसाय करतात. त्यामुळे, ते श्रीमंत असतात.

वर नमूद केलेली कारणे फक्त काही उदाहरणे आहेत. याशिवायही अनेक घटक ते समृद्ध होण्यासाठी जबाबदार आहेत.

**निष्कर्ष :**

भारतामध्ये जैन समाजाचे एक वेगळे स्थान असलेले आपल्याला दिसते. लेखात नमूद केलेले बहुतेक घटक भारतातील इतर समुदायांसाठी विशेष आणि आश्चर्यकारक आहेत. जीवनात काही तत्वांचे जैन लोक आचरण करतात, ज्यामुळेच ते श्रीमंत आणि समृद्ध बनले आहेत.

भारतीय विकास प्रक्रियेमध्ये जैन समुदायाचे योगदान बहुमोल असले तरीही जैन समाजातील काही लोक दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत. सरकारने त्यांना आधार देणे अत्यावश्यक आहे. गरिबी निर्मूलन आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी सरकारला काही विशेष कार्यक्रम राबवावे लागतील, तसेच अर्थ व्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये राज्यवार काही विशेष सुधारणा सरकारने केल्या पाहिजेत; जेणेकरून त्यांना समृद्धीच्या प्रवाहात आणता येईल.

**संदर्भ**


१.प्रतियोगिता दर्पण, (२०२०), उपकार प्रकाशन, नवी दिल्ली.

२. https://en.m.wikipedia.org.

३. https://forum.jinswara.com.

४. Jain Prakash, (2020), "Jain Community of Bundelkhand: Socio-Economic and Cultural Change", Om Publications.

५. निगम शोभा, (२००८), भारतीय दर्शन, मोतीलाल बनारसीदास प्रकाशन, वाराणसी.

६. सिद्धान्तिदेव नेमिचन्द्र। भारिल्ल हुकमचन्द,(२००८), द्रव्यसंग्रह, पंडित टोडरमल स्मारक ट्रस्ट, जयपुर.




※ महावीरवाणी ※

※ आम्ही आपल्याच अपराधामुळे दुःखी आहोत आणि ती चूक सुधारून आपणच सुखी होऊ शकतो.

※ सच्चारित्र हाच धर्म. धर्म म्हणजेच समता आणि समता म्हणजेच वीतरागता.



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Peth Vadgaon Dist Kolhapur